मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १८४ ■ शुक्रवार, १३ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# मध्यपूर्व युद्धाचा फटका

## उरणमध्ये गॅस टंचाई ; हॉटेल व्यावसायिक संकटात ?

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** मध्यपूर्वेत इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यात वाढत असलेल्या तणावाचा परिणाम आता जागतिक बाजारावर स्पष्टपणे दिसू लागला आहे. होर्मुज सामुद्रधुनी बंद होण्याच्या भीतीमुळे तेल आणि गॅसच्या पुरवठ्यावर मोठा दबाव निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेक देशांमध्ये गॅसच्या किमती झपाट्याने वाढू लागल्या असून त्याचा परिणाम भारतावरही दिसून येत आहे.

याच पार्श्वभूमीवर उरणमध्ये कमर्शियल गॅस सिलेंडरची विक्री बंद केल्याने हॉटेल व खानावळ व्यवसायिक चिंतेत पडले आहेत. गॅस उपलब्ध नसल्याने अनेकांना व्यवसाय बंद ठेवण्याची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

तसेच घरगुती गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यावरही मर्यादा घालण्यात आल्याची माहिती गॅस विक्रेत्यांनी दिली आहे. नवीन नियमानुसार 35 दिवसांत एकच घरगुती सिलेंडर मिळणार आहे. बुकिंगचे केल्यानंतर 4 दिवस त्यानंतर सुमारे 31 दिवसांनी घरपोच सिलेंडर मिळणार असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना




घरगुती गॅसचा वापर अत्यंत जपून करण्याची गरज निर्माण झाली आहे.

दरम्यान, अलीकडेच एलपीजी गॅसच्या किमतीत 60 रुपयांनी वाढ झाली असून व्यावसायिक सिलेंडरही जवळपास 115 रुपयांनी महाग झाले आहेत. वाढत्या दरांमुळे आणि कमी पुरवठ्यामुळे अनेक ठिकाणी ऑनलाईन सिलेंडर बुकिंग होत नसल्याने नागरिकांना गॅस एजन्सीबाहेर रांगा लावाव्या लागत आहेत.

यामुळे सिलेंडर संपल्यानंतर स्वयंपाक कसा करायचा, असा प्रश्न अनेक कुटुंबांपुढे उभा राहिला आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत नागरिकांनी गॅसचा वापर अत्यंत जपून करावा, अशी सूचना गॅस वितरकांकडून करण्यात येत आहे.

# राज्यात हवामान बदलाची चिन्हे

## कडाक्याच्या उन्हानंतर 'या' जिल्ह्यांत वादळी पावसाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

राज्यात सध्या उन्हाचा कडाका वाढत असतानाच हवामानात पुन्हा एकदा मोठे बदल होण्याची चिन्हे दिसत आहेत. काही भागात तापमान चाळीशीच्या पुढे गेले असताना दुसरीकडे वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे.

**मार्चमध्येच तापमान चाळीशीपार**

यंदा फेब्रुवारीच्या मध्यापासूनच उन्हाचा तडाखा वाढू लागला होता. मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातच अनेक भागांत तापमानाने चाळीशी गाठली आहे. विदर्भातील अकोला येथे बुधवारी राज्यातील सर्वाधिक ४१ अंश सेल्सिअस तापमानाची



नोंद झाली. विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट जाणवण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे.

**अवकाळी पावसाची शक्यता**

दरम्यान, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर हवामानात बदल होत असून काही भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत राज्यातील काही भागांत अधूनमधून पाऊस झाला होता. आता पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. यापूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी पिकांचे नुकसान झाल्याची नोंद आहे.

**या जिल्ह्यांना पावसाचा इशारा**

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, शुक्रवार आणि शनिवार (१३ व १४ मार्च) या दोन दिवसांत विदर्भ आणि मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. १३ मार्च रोजी यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांसाठी पावसाचा 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. तर १४ मार्च रोजी नागपूर, वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांसाठीही 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

याशिवाय पुणे, नांदेड, बीड आणि परभणी जिल्ह्यांमध्येही अवकाळी पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मराठवाड्यातील लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांत काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याचा अंदाज आहे. काही भागांत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असून जोरदार वारेही वाहू शकतात.

**हवामान खात्याचा अंदाज**

भारतीय हवामान खात्याच्या माहितीनुसार, राज्यातील हवामानात चढउतार सुरूच राहतील. काही भागांत ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असून विदर्भात उष्णतेचा कडाका अधिक जाणवत आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या आसपास पोहोचले आहे.दरम्यान, मुंबई, पालघर आणि ठाणे जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. अकोला जिल्ह्यासाठी उष्णतेचा 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून काही भागांत तापमान आणखी वाढण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे.

# वीझमनीच्या 335 व्या शाखेचे नवीन पनवेलमध्ये उद्‌घाटन



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** वीझमनीच्या 335 व्या शाखेचे नवीन पनवेलमध्ये मोठ्या उत्साहात 12 मार्च रोजी उद्धाटन करण्यात आले. यावेळी सीईओ कृष्णन आर, सिएफओ मनोज मॅथ्यू, सतीश कुमार, रतीश आर, प्रकाश भास्कर, जॉन जॉर्ज, टीटूस के, जिनू जॉर्ज, विनोद अमीन यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. वीझमोनी परवानाधारक वित्तीय सेवा प्रदाता आहे ज्याच्या भारतभर 300+ शाखा आहेत. जे सुवर्ण कर्ज, परकीय चलन, परदेशात पैसे पाठवा, मल्टी-करन्सी ट्रॅव्हल कार्ड, ट्रॅव्हल आणि हॉलिडेज, डिजिटल पेमेंट्स, वॉलेट सोल्यूशन्स आणि विमा देतात. विझमोनीचा भाग, युएई आणि भारतात मुख्यालय असलेल्या जागतिक फिनटेक लीडर, विझमोनी सुरक्षित, तंत्रज्ञान-चालित, अल-संचालित पेमेंट आणि कर्ज देण्याचे उपाय प्रदान करते. उच्च-वाढीच्या बाजारपेठा आणि प्रमुख आर्थिक कॉरिडॉर असून देशभरात सोयीस्कर आणि विश्वासार्ह आर्थिक उपाय प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे. विझमोनी ग्राहकांना अखंड वित्तीय सेवांसह सक्षम बनवत आहे.

# गो ग्रीन' संस्थेच्या पुढाकारातून पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 'बॉटल बिन'ची स्थापना



**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी 'गो ग्रीन' संस्थेच्या पुढाकारातून पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 'बॉटल बिन'ची स्थापना करण्यात आली आहे. गो ग्रीन संस्थेचे संस्थापक भरत सोनी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला आहे. या बिनच्या माध्यमातून प्लास्टिक कचरा व बाटल्या एकत्र करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यास मदत होणार असून प्लास्टिक प्रदूषण रोखण्याचा यामागचा मुख्य उद्देश आहे.

भारतामध्ये वाढत चाललेल्या प्लास्टिक प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर 'गो ग्रीन' संस्थेने पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पुढाकार घेत 'बॉटल बिन' हा अभिनव कचरा व्यवस्थापन बिन सादर केला आहे. हा बिन विशेषतः प्लास्टिक कचरा गोळा करणे, त्याचे विलगीकरण करणे आणि पुनर्वापरासाठी पाठवणे यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. 'बॉटल बिन' सार्वजनिक उद्याने, सरकारी आणि शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, आरोग्य केंद्रे, समुद्रकिनारे, पर्यटन स्थळे, पेट्रोल पंप, ग्रामपंचायती तसेच रेल्वे आणि बस स्थानकांसारख्या ठिकाणी बसविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. यामुळे परिसर स्वच्छ राहण्यास मदत होण्यासोबतच प्लास्टिक कचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन होण्यास चालना मिळणार आहे. परिसरातील नागरिकांनी प्लॅस्टिकच्या वस्तूचा वापर टाळावे तसेच बाटल्या एकत्र करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी याची मदत घ्यावी असे आवाहन वपोनि गजानन घाडगे यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मालाबार ग्रुपचे अध्यक्ष एम. पी. अहमद 'महाराष्ट्रीयन ऑफ द इयर २०२६' पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मालाबार ग्रुपचे अध्यक्ष एम. पी. अहमद यांना 'लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ द इयर २०२६' पुरस्कार सोहळ्यात 'बिझनेस भूषण' या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आपल्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाच्या बळावर दागिन्यांच्या रिटेल विक्री क्षेत्रात जागतिक स्तरावर आमूलाग्र बदल घडवून आणल्याबद्दल आणि समाजासाठी त्यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाची दखल घेऊन हा गौरव प्रदान करण्यात आला आहे.

ऐतिहासिक गेटवे ऑफ इंडिया येथे संपन्न झालेल्या या पुरस्कार सोहळ्यामध्ये आघाडीचे धोरणकर्ते, उद्योगपती आणि व्यवसाय तसेच मनोरंजन क्षेत्रातील दिग्गज व्यक्ती उपस्थित होत्या. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र




फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, लोकमत समूहाचे अध्यक्ष विजय दर्डा यांच्यासह अनेक मंत्री, प्रशासकीय अधिकारी आणि इतर क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीने या सोहळ्याची शान वाढवली.

ज्यांनी आपली दूरदृष्टी, नेतृत्व आणि कामगिरीने उद्योगव्यवसायांना आकार दिला आहे आणि समाजासाठी मोलाचे योगदान दिले अशा व्यक्तींना हे पुरस्कार प्रदान केले जातात. अहमद यांना मिळालेला हा सन्मान एक उद्योजक म्हणून त्यांच्या विलक्षण कारकिर्दीवर प्रकाश टाकतो. मालाबार गोल्डला जगातील पाचव्या क्रमांकाचे आणि भारतीय मूळ असलेले सर्वात मोठे ज्वेलरी रिटेलर बनवण्यात त्यांनी बजावलेली भूमिका अत्यंत वाखाणण्याजोगी आहे.

# जालना जिल्ह्यातील विकास कामासंदर्भात विठ्ठल दादा बरकुले यांनी घेतली उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट



**दैनिक युवक आधार**

**जालना(अशोक ठोके) :** जालना जिल्ह्यातील विकास कामासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जालना जिल्हा संघटक विठ्ठल दादा बुरकुले यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन त्यांना सादर केले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार) गटाचे जिल्हा अध्यक्ष अरविंद चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भेट घेतली असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. या वेळी जिल्हा भरातील विविध विकास कामासंदर्भात चर्चा करण्यात आली. विठ्ठल दादा बरकुले यांच्या कडून उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना दुःखातून सावरण्यासाठी भगवत गीता भेट देण्यात आली. पक्ष आपल्या पाठीशी खंबीर उभा असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी विठ्ठल दादा बरकुले यांना सांगितले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य भाऊसाहेब रावजी गोरे, महाराष्ट्र राज्य महिला सरचिटणीस शकुंतलाताई कदम, जिल्हा सचिव सतीश ढवळे आदी उपस्थित होते.

# गॅस दरवाढी विरोधात काँग्रेसने काढला मोर्चा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** राज्य शासनाने केलेल्या गॅस दरवाढी विरोधात आज पनवेल मध्ये काँग्रेस पक्षा तर्फे पायी मोर्च्या काढण्यात आला. यावेळी प्रतीकात्मक सिलेंडरची अंत्ययात्रा काढून केंद्र व राज्य शासनाचा निषेध करण्यात आला. पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटती जिल्हा अध्यक्ष सुदाम पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज हा मोर्च्या काढण्यात आला. या मोर्च्यामध्ये पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे, महिला आघाडी प्रभारी चंद्रकला नायडू, नगरसेवक हरेश केणी, लतीफ शेख, लीला कातकरी, डॉक्टर अमित दवे, अमित लोखंडे,राकेश जाधव, सुरेश पाटील, सुधीर मोरे यांच्यासह शेकडो त्रस्त ग्राहक शभंगाची झाले होते त्यांनी मोदी सरकार विरोधात घोषणा दिल्या. तसेच गॅसची दरवाढ रद्द करा अशी मागणी केली. सदर मोर्च्या हा प्रांत कायार्लयापर्यंत नेण्यात आला. यावेळी निवेदन देताना पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटती जिल्हा अध्यक्ष सुदाम पाटील यांनी सांगितले की, शासनाने गडाची




दरवाढ केली आहे. ती सर्वसामान्यांचे कंबरडे मोडणारी आहे. तससह यामुळे गॅस सिलेंडरची कृत्रिम टंचाई दाखवून ३ ते ४ हजाराला सिलेंडर ब्लॅक ने विकले जात आहेत. यासाठी शासनाने भरारी पथक नेमून संबधीतांवर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे, तर नगरसेवक हरेश केणी यांनी सुद्धा मोदी सरकारचा निषेध करून गॅस टंचाईमुळे अनेक हॉटेल बंद पडली आहेत. यातून महागाई वाढणार आहे व कित्येकांच्या उद्योग धंद्यांचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष घालावे अशी मागणी सुद्धा त्यांनी केली आहे.

# खांदा कॉलनीत नगरसेविका सिताताई पाटील यांच्या उपस्थितीत एचपीव्ही लसीकरण मोहीमेला सुरुवात



**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी :** खांदा कॉलनीत पनवेल महापालिका आरोग्य केंद्रात नुकतीच नगरसेविका सिताताई पाटील यांच्या उपस्थितीत एचपीव्ही लसीकरण मोहीमेला सुरुवात झाली या लसीकरणामुळे गर्भाशयाच्या मुख कॅन्सर व गर्भाशयाच्या इतर आजारांपासून मुली सुरक्षित राहू शकतील यासाठी हि मोहीम प्रत्येक सरकारी दवाखान्यात सलग 90 दिवस सुरू राहणार आहे हि लसीकरण मोहीम पुर्णपणे मोफत असेल या आजारापासून सुरक्षित राहण्यासाठी जास्ती जास्त मुलीनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन नगरसेविका सिताताई पाटील यांनी या लसीकरण मोहीमेच्या शुभारंभ प्रसंगी केली

# ठाणेकरांसाठी खास नवीन वर्षाला येतोय आख्यानाचा थाट

## लोककलेचा अविस्मरणीय सोहळा गुढीपाडव्याच्या संध्येला ठाणेकर प्रेक्षकांच्या भेटीस

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत/कल्याण** : महाराष्ट्रात नव्हे भारतात नव्हे तर अवघ्या जगात ज्या कार्यक्रमाची चर्चा असलेला असा कार्यक्रम "द फोक आख्यान" ठाणेकर प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. मोरया एंटरटेनमेंट आयोजित "द फोक आख्यान" हा कार्यक्रम दिनांक १९ मार्च २०२६ रोजी टी एम सी मैदान , हिरानंदानी इस्टेट, ठाणे येथे भव्यदिव्य स्वरूपात सादर होईल.

या संदर्भात अधिक माहिती देण्याकरिता आज बुधवारी आयलीफ रिट्झ बँक्वेट्स, आर मॉल, ठाणे येथे पत्रकार परिषेदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेस संगीतकार हर्ष राऊत , लेखक दिग्दर्शक लमाणबंधू ईश्वर अंधारे, निर्माते रणजीत गुगळे व भूषण मेहरे, मोरया एंटरटेनमेंट संस्थापक व आयोजक विशाल गारगोटे, गायिका अनुजा देवरे, गायिका रुचा कुलकर्णी, शाहीर चंद्रकांत माने,वादक पृथ्वीराज देशमुख , समाजसेवक योगेश मुंधरा (एक ठाणेकर फाउंडेशन) यांनी उपस्थित राहून माध्यमांशी संवाद साधला. आयलीफ रिट्झ बँक्वेट्स चे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक उद्योजक प्रतिश आंबेकर यांनी या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्यात

ठाणे येथे आयोजित लोककलेचा अद्भुत असा कार्यक्रम सर्वसामान्य प्रेक्षकांना सहकुटुंब अनुभवता यावा याकरिता तिकिटांचे वाजवी ठेवण्यात येत असलयाचे आयोजक विशाल गारगोटे यांनी सांगितले. या कार्यक्रमची तिकिटे https://www.ticketkhidakee.com/ या वेबसाईट वर उपलब्ध आहे. तिकिटांचे दर केवळ रु. ४९९, रु.९९९, रु.१४९९ असे आहे. या कार्यक्रमात प्रेक्षकांना भव्य अश्या मैदानावर सर्वोत्तम प्रकाश योजना व नेत्रदीपक आतिषबाजी अनुभवास सुद्धा मिळेल ज्या मुळे हा लोककलेचा सोहळा अविस्मरणीय ठरेल.

द फोक आख्यान विषयी थोडक्यात

लोकसंगीत हे महाराष्ट्राचं अमूल्य वैभव आहे. अभंग, भारूड, लावणी, गवळणी असे लोकसंगीताचे अनेक प्रकार आपल्या संस्कृतीत खोलवर रुजलेले आहेत. मात्र बदलत्या काळात या कला हळूहळू लोप पावत असल्याचं चित्र दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर हौशी तरुण रंगकर्मी एकत्र येऊन लोककलेला आधुनिक सादरीकरणाच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहेत. या प्रयत्नातून साकारलेला “द फोक आख्यान” हा एक अनोखा सांगीतिक कार्यक्रम आहे.




'द फोक आख्यान' या कार्यक्रमाचं वैशिष्ट्य म्हणजे आताच्या पिढीला आवडेल अशा स्वरूपात त्यांनी लोककला मांडण्याचा प्रयत्न केला आहे. एकही जुनं गीत न घेता, नवीन गीतं लिहून त्यांना चाली दिल्या आहेत. यातील सगळी गीतं ईश्वर अंधारे यानं लिहिली असून हर्ष विजय यांनी संगीतबद्ध केली आहेत. त्यांनी मराठी लोकसंगीताच्या विविध परंपरांचा अभ्यास करून हा कार्यक्रम उभा केला आहे. पुराणकथा, संतसाहित्य, ओव्या, अभंग, भारूड आणि गवळणी यांचा सखोल अभ्यास करून त्यातील शब्दवैभव, भावना आणि परंपरा नव्या पद्धतीने संगीतबद्ध करण्यात आल्या आहेत.

लोककलाकारांच्या कलेला योग्य मान्यता मिळावी आणि लोकसंगीताचा ठेवा तरुण पिढीपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने हा कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. परंपरा, संगीत आणि नव्या सादरीकरणाचा संगम असलेला “द फोक आख्यान” हा कार्यक्रम मराठी लोकसंगीताच्या वैभवाची नव्याने ओळख करून देणारा ठरत आहे. या कार्यक्रमाची निर्मिती निर्माते रणजीत गुगळे व भूषण मेहरे यांची आहे.

मोरया एंटरटेनमेंट विषयी थोडक्यात

मोरया एंटरटेनमेंट ही कंपनी गेली ११ वर्ष इव्हेंट आणि मनोरंजन क्षेत्रात अग्रस्थानी आहे. या कंपनीच्या माध्यमातून मुंबई , पुणे व देशातील इतर शहरात दर्जेदार कार्यक्रमाची निर्मिती करून प्रेक्षकांना एक उत्तम अनुभव दिला आहे. मोरया एंटरटेनमेंट चे संस्थापक श्री विशाल गारगोटे यांनी नेहमी भव्यता डोळयासमोर ठेवून कार्यक्रमांची निर्मिती केली आहे.

याच गोष्टीचे उदाहरण म्हणजे मार्च २०२४ मध्ये जिओ वर्ल्ड गार्डन मध्ये पहिल्यांदाच सुप्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले यांचा भारतातील सर्वात मोठा कॉन्सर्ट त्यांनी आयोजित केला होता. या कार्यक्रमाला अनेक नामवंत कलाकारांची हजेरी होती. याचबरोबर त्यांनी सोनू निगम लाईव्ह, श्रेया घोषाल लाईव्ह, कैलास खेर लाईव्ह इन कॉन्सर्ट, हरिहरन लाईव्ह इन कॉन्सर्ट, स्वर मिलाफ - उस्ताद अमजद अली खान, शरदोत्सव दांडिया - फाल्गुनी पाठक , विशेष म्हणजे दोन दशकाच्या कालावधीनंतर त्यांनी पार्श्वगायिका के एस चित्रा यांचा कार्यक्रम मुंबई येथे आयोजित केला होता. एवढे सर्व भव्य कार्यक्रम आयोजित करून त्यांनी आपली मराठी भाषा नेहमीच जपली आहे. एक मराठी उद्योजक म्हणून त्यांनी नेहमी मराठी कार्यक्रमाचे सुद्धा आयोजन केलेले आहे त्यामध्ये राष्ट्रीय पुरस्कार विजेते महेश काळे, सुदेश भोसले इतर कार्यक्रमांचा समावेश आहे.

'द फोक आख्यान' हा कार्यक्रम महाराष्ट्रात आता खूप गाजत आहे हा कार्यक्रम सर्वप्रथम मुंबईतील सर्वात मोठ्या षण्मुखानंद हॉल, मुंबई येथे विशाल गारगोटे यांनीच सर्वप्रथम आयोजित केला होता. जिओ वर्ल्ड गार्डन म्हटले की तेथील तिकीट महाग असेल असा सर्व सामान्यांना वाटते. परंतु श्री विशाल गारगोटे यांनी 'द फोक आख्यान' हा कार्यक्रम सुप्रसिद्ध अशा जिओ वर्ल्ड गार्डनमध्ये अत्यंत मापक दरात तिकिटे ठेवून आयोजित केला. तसेच 'द फोक आख्यान' हा कार्यक्रम दुबई व अबू धाबी अर्थातच विदेशात सर्वप्रथम आयोजित करण्याचा मान मोरया एंटरटेनमेंट मिळाला आहे.

---

# अकोट तालुक्यातील आंबोडा येथे केळी पिकावरील शेती शाळेचा समारोप !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/अकोट प्रतिनिधी** :अकोट तालुक्यातील आंबोडा येथे केळी पिकावरील शेतकरी शेती शाळेचा (Farmers Field School) समारोप दिनांक ११ मार्च २०२६ रोजी सरपंच प्रशांतभाऊ ताडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या शेती शाळेमध्ये शेतकऱ्यांना केळी पिकातील आधुनिक तंत्रज्ञान व व्यवस्थापनाबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.




या समारोप सत्रामध्ये कृषी विज्ञान केंद्राचे बागायती विषय तज्ञ गजानन तुपकर यांनी केळी पिकातील ‘बंच फीडिंग’ या तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविले. यामध्ये युरिया ७.५ ग्रॅम, सल्फेट ऑफ पोटॅश (SOP) ७.५ ग्रॅम, शेणखत ५०० ग्रॅम व १०० मिली पाणी यांचे मिश्रण तयार करून ते पॉलिथिन पिशवीत भरून केळीच्या घडाच्या देठाला बांधण्याची पद्धत दाखवून दिली. या तंत्रज्ञानामुळे फळांची वाढ चांगली होऊन घडाचे वजन व उत्पादनात वाढ होते, असे त्यांनी यावेळी सांगितले.

समारोप सत्रात गजानन तुपकर यांनी शेती शाळेच्या संपूर्ण कालावधीत घेण्यात आलेल्या विविध सत्रांचा आढावा घेत केळी पिकातील सुधारित लागवड पद्धती, पोषण व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण तसेच उत्पादन वाढीसाठी आवश्यक तांत्रिक बाबींविषयी माहिती दिली.

कार्यक्रमामध्ये सहभागी शेतकऱ्यांनी शेती शाळेमधून मिळालेल्या प्रत्यक्ष ज्ञानाबाबत समाधान व्यक्त करत सकारात्मक अभिप्राय दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी शेतकऱ्यांना प्रमाणपत्रे व तांत्रिक माहितीपत्रकांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक राहुल अडाणी व सहायक कृषी अधिकारी करणसिंह आसोले यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने करण्यात आला.

---

# रायगड जिल्हा परिषदेच्या इतिहासात प्रथमच भाजपाचा अध्यक्ष

**दैनिक युवक आधार**

**प्रसाद हनुमंते (रायगड) : रायगड** जिल्हा परिषदेच्या इतिहासात प्रथमच भारतीय जनता पक्षाचा अध्यक्ष होणार असल्याने जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे शिरढोण गावचे मंगेश वाकडीकर यांच्या रूपाने रायगड जिल्हा परिषदेला भाजपाचा पहिला अध्यक्ष मिळणार असून, ही नोंद जिल्हा परिषदेच्या इतिहासात महत्त्वाची ठरणार आहे.

रायगड जिल्हा परिषदेची स्थापना झाल्यापासून आजवर भारतीय जनता पक्षाला अध्यक्षपद मिळाले नव्हते. जिल्हा परिषदेवर दीर्घकाळ शेतकरी कामगार पक्षाचे वर्चस्व राहिले होते. मात्र नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपाने जोरदार मुसंडी मारत शेकापचा सुपडा साफ केला आणि प्रथमच जिल्हा परिषदेवर सत्ता मिळवली आहे.

आजपर्यंत रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदावर विविध पक्षांच्या प्रतिनिधींनी काम पाहिले असले, तरी भारतीय जनता पक्षाला प्रथमच हे पद मिळत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण पसरले आहे.

मंगेश वाकडीकर हे शिरढोण गावचे असून त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय काम केले आहे. त्यांच्या निवडीमुळे रायगड जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून जिल्ह्यातील विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

रायगड जिल्ह्यातील भाजपच्या तमाम कार्यकर्त्यांसाठी ही अत्यंत अभिमानाची आणि ऐतिहासिक बाब मानली जात आहे.

---

# प्रबोधनाच्या सुरातून स्वाभिमानाचा उदरनिर्वाह — गायक सुशीलकुमार सद्धर्मी दाम्पत्याचा प्रेरणादायी प्रवास

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे/भंडारा** : समाजप्रबोधनाच्या सुरांनी जनतेला जागृत करणारे गायक व प्रबोधनकार सुशीलकुमार सद्धर्मी आणि त्यांच्या पत्नी पिंकी सद्धर्मी यांनी स्वाभिमानाने कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी भंडारा येथील जिल्हा परिषद चौकात भेल, नाश्ता आणि चहाचे छोटेसे दुकान सुरू केले आहे. आपल्या कलेच्या माध्यमातून समाजात विचारांची जागृती घडवणारे हे दाम्पत्य आज कष्टाच्या जोरावर स्वतःचा संसार उभा करत असल्याने त्यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

समाजात फुले–शाहू–आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार करत, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची प्रेरणा जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम सुशीलकुमार सद्धर्मी आपल्या गायन आणि प्रबोधनातून सातत्याने करत आले आहेत. परिस्थिती काहीही असो, त्यांनी कधीही स्वाभिमान सोडला नाही. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी त्यांनी आणि



त्यांच्या पत्नीने मेहनतीने उभे केलेले हे छोटेसे दुकान त्यांच्या जिद्दीचे प्रतीक बनले आहे.या दुकानाला अचानक भेट देऊन चहाचा आस्वाद घेत रक्तवीर-रुग्णमित्र व प्रहारचे जिल्हा उपाध्यक्ष जयेंद्र देशपांडे यांनी दाम्पत्याच्या कष्टाचे कौतुक केले.

“इतक्या तळमळीने समाजप्रबोधन करणाऱ्या आणि फुले-शाहू-आंबेडकरांचे विचार जनतेपर्यंत पोहोचवणाऱ्या कलाकारांना आजही संघर्ष करावा लागत आहे, ही खेदाची बाब आहे. तरीही स्वाभिमानाने कष्ट करून संसार उभा करणारे सद्धर्मी दाम्पत्य समाजासाठी आदर्श आहे,” असे भावनिक उद्गार त्यांनी व्यक्त केले.आजच्या काळात डीजे आणि मनोरंजनाच्या गोंगाटात समाजप्रबोधन करणाऱ्या कलाकारांकडे दुर्लक्ष होत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. वामनदादा कर्डक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या परंपरेतील प्रबोधनकार कलाकारांना समाजाने आणि प्रशासनाने योग्य व्यासपीठ व मानधन देण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. सुशीलकुमार सद्धर्मी हे उत्तम गायक असून ते परिस्थितीनुसार स्वतःच गाणी लिहून सादर करतात आणि आपल्या कलेतून समाजजागृती करण्याचा प्रयत्न करतात. आपल्या मुलगा आणि मुलीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मेहनत करणारे हे दाम्पत्य आज कष्ट, स्वाभिमान आणि सामाजिक बांधिलकी यांचे सुंदर उदाहरण ठरत आहे. समाजप्रबोधनाची ज्योत जिवंत ठेवत कष्टाच्या बळावर उभे राहिलेले सद्धर्मी दाम्पत्य आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

---

### यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त विधानभवनात अभिवादन

# ‘बहुजन हिताय, बहुजन सुखाय’ हे यशवंतराव चव्हाणांचे विचार आजही मार्गदर्शक— उपसभापती डॉ . नीलम गोऱ्हे

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, वार्ताहर / अरविंद बनसोडे कुरनूरकर** : महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि देशाचे माजी संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त आज विधानभवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्यात आले. आज विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनीही पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली.

या प्रसंगी विधानपरिषद सभापती राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मंत्री आणि आमदारांनी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून त्यांचे स्मरण केले.

यावाबत बोलताना उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, महाराष्ट्राचे लोकनेते आणि दूरदृष्टीचे नेतृत्वातील असलेले यशवंतराव चव्हाण यांनी समाजातील वंचित घटकांना अधिक अधिकार आणि संधी मिळाव्यात यासाठी




सातत्याने प्रयत्न केले. आज “बहुजन हिताय, बहुजन सुखाय” या विचारातून त्यांनी दुर्लक्षित घटकांना सक्षम करण्याचा ध्यास घेतला.

तसेच पुढे म्हणाल्या की, राजकारणाबरोबरच साहित्य, संस्कृती आणि सामाजिक क्षेत्राशीही यशवंतराव चव्हाण यांचा सातत्याने संवाद होता. ते कलारसिक आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या पत्नी रेणूताई चव्हाण यांनाही वाचनाची विशेष आवड होती.

आज या साताऱ्यातील ‘विरंगुळा’ हे त्यांचे निवासस्थान आज स्मृतीस्थान म्हणून जतन करण्यात आले असून तेथील समृद्ध ग्रंथसंपदा त्यांच्या वैचारिक परंपरेची साक्ष देते. महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर यशवंतराव चव्हाण यांचा ठसा आजही कायम असून विधानमंडळात त्यांना आदरांजली अर्पण करण्याची संधी मिळणे ही अभिमानाची बाब असल्याची भावना डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केली.

---

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प लाखनी या कार्यालयात खोटा दस्तऐवज तयार करून प्रशासनाची व शासनाची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया/भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : जिल्हाधिकारी, भंडारा या कार्यालयांनी दि. ०८.०८.२०२५ ला मुरमाडी/तुपकर व इतर महसूल मंडळात आधार संच कीट वाटप करीत असल्याबाबत जाहिरात दिली होती. श्री. महेश मधुकर गिर्ह्पुंजे, VLE, यांच्याकडे महिला व बाल विकास विभागाचे आधार संच होते. सदर आधार संच त्यांच्याकडे असताना देखील त्यांनी दि. ०८.०८.२०२५ ला दिलेल्या जाहिरातीत भाग घेऊन अर्ज सादर केला होता. मात्र जाहिरातीप्रमाणे किंवा नियमाप्रमाणे भाग घेण्यापूर्वी अर्जदाराकडे कोणत्याही कार्यालयाचे आधार संच नसावा अशी अट आहे. तरीही श्री. महेश मधुकर गिर्ह्पुंजे, VLE यांनी दि. ०८.०८.२०२५ च्या जाहिराती नुसार बेकायदेशीरपणे भाग घेऊन अर्ज केला व जिल्हाधिकारी कार्यालयाने त्याला बेकायदेशीर व नियमबाह्य दि. २३.०९.२०२५ ला आधार संच कीट वितरीत केले होते.

याबाबत श्री. महेश मधुकर गिर्ह्पुंजे यांनी सदरील बाब प्रशासनाच्या लक्षात येउ नये म्हणून त्यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प लाखनी या कार्यालयातील श्री. प्रकाश ता. मेंढे, बाल विकास प्रकल्प अधिकारी व श्री. आर. एम. रोटके, विस्तार अधिकारी (सा) यांच्याशी संगनमत करून दि. १०.०८.२०२५ रोज रविवार या शासकीय सुट्टीच्या दिवशी श्री. महेश मधुकर गिर्ह्पुंजे यांनी आधार संच परत केला असल्याचे श्री. आर. एम. रोटके, विस्तार अधिकारी (सा) यांनी अर्ज स्वीकारले असल्याचे दाखविले आहे. तर आधार संच परत मिळाले असल्याचे प्रकाश ता. मेंढे, बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी कार्यालयीन जावक क्र. ३६६ दि. १०.०८.२०२५ ला मिळाले असल्याचे खोटे व बनावट दस्तऐवज तयार करून प्रशासनाची व शासनाची दिशाभूल करून फसवणूक केली आहे. सदर कार्यालयात महेश मधुकर गिर्ह्पुंजे यांच्या दि. १०.०८.२०२५ च्या बनावट पत्राची आवक नोंद नसून जावक ची नोंद केली असल्याचे आढळून आले. तसेच मा.जिल्हाधिकारी यांनी दि. २९.०९.२०२५ ला घेतलेल्या सुनावणीत महेश मधुकर गिर्ह्पुंजे यांनी आधार संच परत केले नसल्याचे स्व:ता मान्य/कबुल केले असून त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या दि. ०३.१०.२०२५ च्या आदेशात हि बाब नमूद केली आहे.

श्री. महेश मधुकर गिर्ह्पुंजे एवढ्यावरच न थांबता त्यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प लाखनी या कार्यालयात दि. १०.०८.२०२५ ला आधार संच परत केले असल्याचे व त्या पत्रावर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नावाने प्रतिलिपी नसतानाही त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील आवक-जावक लीपिकाशी संगनमत त्या पत्रावर दि, २९.०९.२०२५ ला पत्र दिले असल्याची पोच घेतली असून त्यावर जिल्हाधिकारी कार्यालयाचा शिक्का लावलेला आहे.

श्री. महेश मधुकर गिर्ह्पुंजे याला आधार संच मिळण्याकरिता पात्र उमेदवारांना डावलण्याकरीता त्यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प लाखनी या कार्यालयातील अधिकारी श्री. प्रकाश ता. मेंढे, बाल विकास प्रकल्प अधिकारी व श्री. आर. एम. रोटके, विस्तार अधिकारी (सा) यांच्याशी संगनमत करून दि. १०.०८.२०२५ रोज रविवार या शासकीय सुट्टीच्या दिवशी खोटा दस्तऐवज तयार करून प्रशासनाची व शासनाची दिशाभूल केली असल्याने मा. जिल्हाधिकारी तसेच मा. जिल्हा कार्यक्रम अधिकारी, (महिला व बालविकास), जिल्हा परिषद, भंडारा यांच्याकडे तक्रार करून त्यांच्या विरोधात फौजदारी कार्यवाही करून त्यांना सेवेतून निलंबित करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ता डॉ. दिपराज इलमकार यांनी केली आहे.

# विधानसभेत अमित भाऊ झनक यांचा दमदार आवाज; रिसोड-मालेगाव मतदारसंघातील प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधले”

## पर्यटन विकास, शेतकरी प्रश्न, ग्रामीण रस्ते, सौरऊर्जा नियम, पिकविमा व रोजगारासाठी AI-गेमिंग हबची जोरदार मागणी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात रिसोड-मालेगाव मतदारसंघाचे कार्यसम्राट व लाडके आमदार अमित भाऊ झनक यांनी सभागृहात दमदार आवाज उठवत मतदारसंघासह वाशिम जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधले. ग्रामीण भागातील प्रलंबित विकासकामे तातडीने मार्गी लावण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

अधिवेशनादरम्यान आमदार झनक यांनी ग्रामीण विकास, शेतकरी प्रश्न, पर्यटन, रोजगार निर्मिती तसेच तरुणांच्या भवितव्याशी संबंधित अनेक महत्त्वाचे मुद्दे प्रभावीपणे सभागृहात मांडले.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या टप्पा क्रमांक २ मधील प्रलंबित रस्त्यांची कामे तात्काळ सुरू करून ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था मजबूत करावी, अशी मागणी त्यांनी केली. त्याचबरोबर मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ता योजना पुन्हा सुरू करून शेतकऱ्यांना थेट शेतापर्यंत रस्ते उपलब्ध करून द्यावेत, जेणेकरून शेतीमालाची वाहतूक सुलभ होईल, असेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना हप्ते वेळेवर मिळत नसल्यामुळे अनेक घरकुलांची कामे रखडली आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांना वेळेत निधी मिळण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही त्यांनी सभागृहात केली.

यासोबतच वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी, शिरपूर, लोणार आणि सिंदखेडराजा या पर्यटन स्थळांचा सर्वांगीण विकास करून आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच ही पर्यटनस्थळे रेल्वेमार्गाने जोडल्यास पर्यटनाला मोठी चालना मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

राज्यात महावितरणकडून सौरऊर्जा ग्राहकांवर लावण्यात आलेला कॅपेसिटी कॅपिंग नियम रद्द करावा, अशीही ठाम मागणी आमदार झनक यांनी केली. नदीजोड प्रकल्पामध्ये वाशिम जिल्ह्यातील सहाही तालुक्यांना समप्रमाणात पाणी मिळावे, असेही त्यांनी सांगितले.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांसाठी पिकविमा कंपन्यांनी ट्रिगर कमी केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना विमा मिळाला नाही. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना तातडीने पिकविमा मिळावा, अशी







मागणी त्यांनी केली. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दिले जाणारे प्रोत्साहन अनुदान सध्या ५० हजार रुपये असून ते वाढवून दीड लाख रुपये करण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी सभागृहात केली.

ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्यासाठी AI तंत्रज्ञानावर आधारित डेटा सेंटर ग्रामीण भागात उभारावेत, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होईल, असा अभिनव प्रस्तावही त्यांनी मांडला. आजच्या युवा पिढीला सकारात्मक दिशा मिळावी यासाठी ॲनिमेशन, गेमिंग आणि व्हिज्युअल इफेक्ट्स (VFX) हब उभारण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आमदार झनक यांनी सभागृहात मांडलेल्या या विविध प्रश्नांमुळे रिसोड-मालेगाव मतदारसंघासह वाशिम जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

त्यांच्या आक्रमक आणि अभ्यासपूर्ण भूमिकेमुळे मतदारसंघातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

> **“रिसोड-मालेगाव मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाचा प्रश्न शासनापर्यंत पोहोचवणे ही माझी जबाबदारी आहे. ग्रामीण विकास, शेतकऱ्यांचे प्रश्न, रोजगार निर्मिती आणि तरुणांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मी विधानसभेत सातत्याने आवाज उठवत राहणार आहे.आपल्या मतदारसंघाचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय आहे.”**
>
> **— अमित भाऊ झनक**
> **आमदार, रिसोड-मालेगाव मतदारसंघ**

### दैनिक युवक आधारचा प्रश्न

**मालेगाव-आमखेडा रस्त्याचा मुद्दा अधिवेशनात का नाही?**

मालेगाव-आमखेडा या महत्त्वाच्या रस्त्याचा प्रश्न अधिवेशनात ठळकपणे मांडला जाईल, असा शब्द आमदार अमित भाऊ झनक यांनी दिला होता.मात्र अर्थसंकल्पीय अधिवेशनात या रस्त्याचा मुद्दा अपेक्षेप्रमाणे मांडला गेला नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.विशेष म्हणजे या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत दैनिक युवक आधार या वृत्तपत्राने सातत्याने पाठपुरावा करत अनेकदा बातम्या प्रसिद्ध केल्या आहेत.त्यामुळे आगामी अधिवेशनात तरी या रस्त्याचा प्रश्न ठामपणे मांडून मार्गी लावला जाईल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली होती.

# जीवनात यशस्वी होण्याचा मंत्र महाभारत देते – स्वामी गोविंददेव गिरीजी

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी/शिवाजी पवार** : चार पुरुषार्थ, चार आश्रम, चार वर्ण, चार साधना याचे सर्व ज्ञान असलेला एकमेव महाभारत हा ग्रंथ आहे. नित्य महाभारत श्रवणाने बुध्दी तिक्ष्ण होते. यशस्वी होण्याचा मुलमंत्र महाभारत कथा देते. असे प्रतिपादन स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी केले. शहरातील सातोना रस्त्यावरील मयुरी पार्क परिसरातील अलंकापुरी नगरीत गुरूवार ( दि.१२ ) रोजी फिरता ज्ञानेश्वरी पारायण सांगता सोहळ्यात स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या अमृतवाणीतून



' महाभारत संदेश कथा ' प्रारंभ झाली. पुढे बोलताना स्वामी गोविंददेव गिरीजी म्हणाले की, " महाभारत भारतीय संस्कृतीचा ज्ञानकोश आहे. आपल्या समृद्ध संत परंपरेने दिलेला जय जय रामकृष्ण हरी हा केवळ जप करण्याचा मंत्र नाही. तर आपल्या जीवनाचा अभ्यासक्रम आहे. माणसाने वयाच्या २० व्या वर्षांपर्यंत रामकथेतून निती शिकावी. तारूण्यात कसं जिंकाव ही युक्ती महाभारतातून शिकावी. उतारवयात भागवतामधून मुक्ती शिकावी. माणसाने जीवनात कधीही हार मानू नये. झालेल्या चुका दुरुस्त करून जीवनाची वाटचाल करावी. केवळ महिला दिनीच नाही तर महिलांना रोज सन्मानाने वागवले पाहिजे. जी माणसे विवेक जागृत ठेवून जगतात. ज्यांनी क्रोध सोडून दिला. त्याला जीवनात पच्छात्ताप करण्याची वेळ येत नाही. हा संदेश महाभारत कथा देते." असेही स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज म्हणाले. प्रास्ताविक ह.भ.प. पंडित महाराज डाके यांनी केले. सुत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन प्रा. संजय पिंपळगावकर यांनी केले.

सावित्रीबाई बिहाणी, जयप्रकाश बिहाणी, किरण बिहाणी, राम नाना पाटील, माधुरी पाटील, नारायण मुसळे, गजानन आघाव, डॉ.आशिष डख, अशोक पटवारी, कचरू शेरे, ओमप्रकाश मेहता, पारस काला यांची विशेष उपस्थिती होती.

भावीकांसाठी चिकलठाणा (खु.), कौसडी, हातनुर, घोडके पिंपरी,राणी वाहेगाव, प्रिंपुरा,कंरजी, करजखेडा ( पु.) या गावातील गावकऱ्यांनी सेवा दिली. सकाळ सत्रात पारायणास आणि दुपार सत्रात महाभारत संदेश कथेस पंधरा हजारांहून अधिक भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# प्राचार्य डॉ . चंद्रकांत दिघावकर यांचा विश्व मराठी साहित्य संमेलनात सहभाग

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले , सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी के. टी. एच. एम महाविद्यालय नाशिक येथे प्रांगणात पार पडलेल्या चौथ्या विश्व मराठी साहित्य संमेलनात महाविद्यालयाच्या वतीने समारोप प्रसंगी सहभाग दर्शवला.यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, डॉ. संजिव सोनवणे ( कुलगुरू य.च.मुक्तविद्यापीठ नाशिक) डॉ. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरू मुंबई विद्यापीठ) डॉ. अविनाश आवलगावकर (कुलगुरू मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर) डॉ. शैलेंद्र देवळानकर (संचालक उच्च शिक्षण




विभाग महाराष्ट्र) यांच्यासह इतर पदाधिकारी व साहित्यिक उपस्थित होते. समवेत डॉ.दिघावकर यांनी चौथ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने सुरगाणा महाविद्यालयाच्या वतीने सहभागी झाल्याबद्दल महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे, डॉ.चंद्रकांत पाटील, डॉ.गुलाब पवार, प्रा.सुरेश भोये यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी ही कौतुकास्पद बाब अधोरेखित केली गेली आहे.

# शेळी फार्मच्या आडून ड्रग्जविक्री; दोघांना अटक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** शेळी फार्मच्या आडून ड्रग्जविक्री करणाऱ्या दोघांना अमलीपदार्थ विरोधी पथकाने अटक केली. त्यांच्याकडून सुमारे ५.३९ लाखांचे एमडी ड्रग्ज जप्त केले. डिसेंबर २०२५ मध्ये नोंद झालेल्या एका गुन्ह्यात त्यांचा सहभाग समोर आल्यानंतर पोलिस त्यांच्या शोधात होते. अखेर कळंबोली येथील ठिकाणी छापा टाकून कारवाई करण्यात आली. न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली आहे.

पंजाबमधून नवी मुंबईत ड्रग्ज पुरवठा करणाऱ्या आणि विक्री करणाऱ्या अनेकांना यापूर्वी अटक केली आहे. तळोजा परिसरातील एका कारवाईदरम्यान काही संशयितांचा तपास सुरू असताना त्यातील एक व्यक्ती कळंबोली सेक्टर १३ येथे शेळी फार्म चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप निगडे यांच्या पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला. मोहम्मद चौधरी उर्फ वसीम लुंगीवाला (५०) आणि अम्रान पटेल (३२) या दोघांना ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्यांच्याकडून १३ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त केले. या ड्रग्जचे बाजारमूल्य सुमारे ५ लाख ३९ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# रिठद येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/ रणजीत सिंह ठाकुर** : रिसोड तालुक्यातील रिठद येथील छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे आयोजन करण्यात आले असून रिसोड महसूल विभागाच्या वतीने रिठद महसुली मंडळातील सर्वच विभागांची तक्रारी समजुन घेण्यासाठी व त्या प्रत्येक तक्रारींचे निवारण त्याच ठिकाणी करण्यात येणार आहे. यासाठी रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी सर्वच शेतकऱ्यांना व तक्रारदारांना आपल्या तक्रारी मांडण्याचे आवाहन केले आहे.

यामध्ये कृषी विभाग अंतर्गत येणाऱ्या तक्रारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, आयुष्यमान आरोग्य कार्ड, सेतू सुविधा केंद्र, वन विभाग, बीएलओ स्टॉल, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, दिव्यांग योजना, बचतगट, पुरवठा विभाग, आधार कार्ड स्टॉल, अंगणवाडीत सेविका स्टाप, पंचायत समिती अंतर्गत स्टॉल, घरकुल योजनेच्या तक्रारी,महसूल विभाग, यांच्यासह अनेक विभागाच्या स्टॉल असणार आहेत. त्या प्रत्येक विभागाच्या तक्रारीची निवारण या अभियानांतर्गत करण्यात येईल. तसेच बेलखेडा येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक यांच्या अंतर्गत मराठी शाळा वाचवा ही नाटिका सादर करण्यात येणार आहे. पांदण रस्ते मोकळे करणे, व त्याची सातबारावर नोंद घेणे. शेतकऱ्यांना सातबारा वाटप करणे.एस टी बस चे स्मार्ट कार्ड (६०वर्षावरील),सातबारा दुरुस्ती नाव दुरुस्ती इत्यादी समस्या असल्यास दूर करणे. हे या शिबिरामध्ये होणार आहे. या शिबिरासाठी वाशिम जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कुंभेजकर, उपविभागीय अधिकारी (महसूल) वैशाली देवकर, रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर, गटविकास अधिकारी रिसोड, रिठद महसूल मंडळाचे मंडळ अधिकारी गरकळ, प्रत्येक ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी, रिठद महसूल मंडळातील महसूल अधिकारी व महसूल कर्मचारी, तालुका कृषी अधिकारी व सर्व सहाय्यक कृषी अधिकारी अंगणवाडी सेविका मदतनीस, आशा वर्कर्स उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाचे स्थळ जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा रिठद क्रमांक १ येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती रिठद महसुली मंडळाचे मंडळ अधिकारी गरकळ यांनी दिली आहे.

# सफाई कामगार महादू जगताप यांच्यावर भ्याड हल्ला करणाऱ्या अज्ञात व्यक्तीला कठोर शिक्षा झालीच पाहिजे !

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उल्हासनगर महापालिकेमधील कंत्राटी सफाई कामगार महादू जगताप यांच्यावर एका अज्ञात इसमाने दिवसा ढवळ्या धारधार हत्याराने भ्याड हल्ला करून खून केल्याचा घटनेने संपूर्ण उल्हासनगर शहर हादरले आहे .या संदर्भात दि. 11 मार्च 2026 रोजी राज्यात सर्वत्र संघर्ष समितीच्या मार्गदर्शनाखाली सन्माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री श्री एकनाथजी शिंदे आणि मा. उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायती मधील मुख्याधिकारी आणि तालुका तहसिलदार यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले आहे.

कंत्राटी सफाई कामगार महाद जगताप हे स्वतःचे आरोग्य धोक्यात टाकून जनतेचे आरोग्य अबाधित ठेवणारा एक गरीब सेवक होता. त्यांचा खून झाला, उल्हासनगर शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी ऊन , वारा - पाऊस, थंडी, विविध नैसर्गिक व मनूष्य निर्मित दुर्घटना होतात त्यामध्ये रक्ताचे पाणी करून काम करणारे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोवीड सारख्या जागतीक महामारी आली तेव्हा स्वतःचा जीव धोक्यात टाकून जनतेचे जीव वाचवण्यासाठी जीवाची बाजी लावणाऱ्या आपल्या महादू जगताप या गरीब बांधवांला खरोखर फक्त भावपूर्ण श्रद्धांजली! वाहून चालणार नाही.



अशाप्रकारच्या त्या अज्ञात हल्लेखोराला पोलीस यंत्रणेने पकडून , मा. न्याय व्यवस्थेने त्या खुन्याला कठोरात कठोर शिक्षा करावी.2) आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे उल्हासनगर महापालिकेमधील गरीब कंत्राटीसफाई कामगार त्यांच्या कुटूंबाचा एकमेव आधार महादू जगताप यांच्या कुटुंबातील सदस्यांना योग्य आर्थिक मदत आणि त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरीत सामावून घेण्यात यावे. 3) या दुर्घटनेप्रमाणे आपल्या महाराष्ट्र राज्यात सरकारी कामात अडथळा निर्माण करून सरकारी कर्मच्याऱ्याना जबर मारहाण होण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहे ही वस्तुस्थिती आहे. तरी या संपूर्ण परिस्थितीचा गांभीर्याने विचार करता राज्यातील कामगार, कर्मचाऱ्यांचे , अधिकार्यांचे मनोधैर्य उत्तम दर्जेदार काम देण्यासाठी वाढावे या संपूर्ण परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी कायद्यात महत्त्वपूर्ण बदल करून सरकारी काम करणाऱ्या कर्मचार्यांना पूर्णत: संरक्षण मिळेल आणि गुन्हेगारांना दहशत बसेल अशा प्रकारे कायद्यात दुरुस्ती करावी.

या मागणी साठी आज मा. मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री श्री एकनाथजी शिंदे आणि मा. उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना राज्यातील, विविध नगरपरिषदा आणि नगरपंचायती मधील मुख्याधिकारी तसेच तहसिलदार यांच्या मार्फत बहुसंख्य कामगारांनी संघर्ष समितीचे निमंत्रक डॉ. डि. एल. कराड, ॲड सुरेश ठाकूर, श्री रामगोपाल मिश्रा, श्री रामेश्वर वाघमारे, मुख्य संघटक श्री संतोष पवार, ॲड सुनील वाळूंजकर, समन्वयक अनिल जाधव, अनिल पवार,अण्णा पाटील,रमेश कदम, भिवाजी वाघमारे, यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन सादर करण्यात आले.

# तळेगांव जामा मस्जिद येथे पवित्र रमजान महिन्या निमित्त भीमआर्मी एकता मिशन च्या वतीने इफ्तार पार्टी संपन्न

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर /रुपेशकुमार ग.श्रीरामवार** : नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील तळेगांव जामा मस्जिद येथे भीमआर्मी एकता मिशन च्या वतीने पवित्र रमजान महिन्या निमित्त इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्त रमजान महिन्याचे उपवास करणाऱ्यांनी एकत्रितपणे सामुहिक उपवास सोडला आणि इफ्तार केले.





या कार्यक्रमात विशेष उपस्थित तळेगांव जामा मस्जिद चे सदर एजास बेग, तकीर बेग, अफसर बेग मस्जिद चे अमीर मुस्सा बेग , भिम आर्मी नांदेड जिल्हाध्यक्ष श्री.स्वप्नीलजी भोसीकर, नांदेड जिल्हा निरीक्षक बुद्धिवंत लोखंडे, जिल्हा सहसचिव श्रीकांत वाघमारे, जिल्हा सोशल मीडिया उपाध्यक्ष फारुख भाई बेग, जिल्हा कोषाध्यक्ष नदीम भाई बेग, उमरी चे शाहिद बेग, फराद बेग, रफत बेग, अलीम टेलर शेख, आहेमद बेग, मुस्ताक बेग, इसा बेग, रियाज बेग, किजर बेग , अलीस बेग,मुजमील बेग, नुर बेग, सजाद बेग, बरकत बेग, फ्याज बेग, इरफान बेग , बशीर नाना बेग ,अनवर बेग , खैसर बेग यांच्यासह इतर कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते. या वेळी भिम आर्मी नांदेड जिल्हाध्यक्ष श्री.स्वप्नील जी भोसीकर व सर्व उपस्थित मान्यवरांच्या वतीने पवित्र रमजान महिन्याच्या शुभेच्छा दिल्या आणि सामाजिक बंधुता व एकता आणि सामाजिक सौहार्दाचा संदेश यावेळी देण्यात आला.

# उरणच्या लेकींचा जल्लोष; 'क्षण वेचू या आनंदाचे' म्हणत 20व्या महिला मेळाव्याने गाठले उत्साहाचे शिखर!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** नारी शक्तीचा सन्मान, कलेचा आविष्कार आणि कर्तृत्वाचा जागर अशा त्रिवेणी संगमाने उरण महिला सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक संस्थेचा २०वा भव्य मेळावा दिमाखात पार पडला. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च रोजी महाराष्ट्र भूषण डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी कन्या शाळेच्या प्रांगणात हा सोहळा संपन्न झाला. 'क्षण वेचू या आनंदाचे' या संकल्पनेने उपस्थित शेकडो महिलांच्या आयुष्यात उत्साहाचे नवे रंग भरले.

कार्यक्रमाची सुरुवात अतिशय पारंपारिक आणि उत्साही वातावरणात झाली. लेझीमचा ताल आणि ढोल-ताशांच्या गजरात पाहुण्यांचे दिमाखात स्वागत केले. दीपप्रज्वलनाने सोहळ्याचा मंगलमय प्रारंभ झाला. संस्थेच्या सचिव निशा शिरधनकर यांनी संस्थेच्या यशस्वी वाटचालीचा अहवाल सादर करून



संस्थेच्या सामाजिक कार्याची व्याप्ती उपस्थितांसमोर मांडली.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्या प्रसिद्ध ऑडिओ लॉजिस्ट व सामाजिक कार्यकर्त्या सावनी गोडबोले, भावनाताई घाणेकर उरणच्या नगराध्यक्षा यांनी महिलांना आरोग्य, स्वावलंबन आणि स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारे प्रबोधन केले. संस्थेच्या अध्यक्षा गौरी देशपांडे यांनी आपल्या हृदयस्पर्शी कवितेतून स्त्रीच्या जीवनातील विविध छटा आणि समाजातील तिचे अढळ स्थान मांडले, ज्याला उपस्थितांची मोठी दाद मिळाली.महिलांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ,तसेच महिलांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने त्यांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी विविध वस्तूंचे स्टॉलस् हि लावण्यात आले होते.

या मेळाव्याचे सर्वात मोठे आकर्षण ठरले ते म्हणजे ५० आणि ६० वर्षांच्या ज्येष्ठ महिलांचे सादरीकरण! संसाराच्या आणि नोकरी व्यवसायाच्या व्यापात स्वतःला विसरलेल्या या माऊलींच्या ऊर्जेने भरलेल्या परफॉर्मन्सने तरुणाईलाही लाजवीणारे सादरीकरण केले. विविध बचत गट आणि महिला मंडळांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करून कार्यक्रमात रंगत आणली . विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला यामध्ये स्वाती कोशे उद्योजिका ,संगीता साळुंखे अध्यात्मिक क्षेत्र आणि अनिता म्हात्रे जलतरणपटू यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे संस्थेतील सर्व शिलेदारांनाही समाज गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा भव्य मेळावा यशस्वी करण्यासाठी उरण महिला सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा गौरी देशपांडे सचिव निशा शिरधनकर ,कोषाध्यक्षा वर्षा पाठारे , उपाध्यक्षा कल्याणी दुखंडे उपाध्यक्षा दिपाली शिंदे, सीमा घरत, गौरी मंत्री , दीपा मुकादम संगीता पवार, गीता पवार ,जोष्ना येरुणकर, प्रगती दळी यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरले त्यांच्या हातात परिश्रमामुळे चा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन हेमलता वैशंपायन आणि कल्पना गोगटे यांनी केले. वंदे मातरम ने सोहळ्याची सांगता झाली उरण मधील सर्व स्तरातील महिलांचा सक्रिय सहभाग असलेला मेळावा केवळ कार्यक्रम नसून स्त्री शक्तीच्या संघटित ऊर्जेचा एक संवाद ठरला .या मेळाव्यात वेचलेल्या आनंदाचे क्षण केवळ आठवणींच्या कप्प्यातच राहणार नसून उद्याच्या संघर्षात प्रत्येक स्त्रीला नवी उमेद लढण्याची ऊर्जा देणारे ठरतील.

# सामाजिक कार्याला सलाम; प्राचार्य कमलाकर टेमधरे सर व शालिग्राम पठाडे सरांचा भव्य सत्कार"

**दैनिक युवक आधार**

**रिसोड :( प्रतिनिधी ) रणजीतसिंह ठाकूर** : स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय, रिसोडचे संचालक तथा प्राचार्य कमलाकर टेमधरे सर यांच्या वाढदिवसानिमित्त क.रा. टेमधरे फाउंडेशनच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. या वेळी नगरपरिषद जल व्यवस्थापन विभागातील विनोद बांगर यांनी शहरात चिमण्यांचे संवर्धन व्हावे या उद्देशाने चिमणीसाठी घरटे वाटप करण्याचा उपक्रम राबविला. तसेच उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील चौका-चौकात प्राणी व पक्ष्यांसाठी पाण्याचे हौद ठेवून मानवतेचा संदेश दिला.

या सामाजिक कार्याची दखल घेत प्राचार्य कमलाकर टेमधरे सर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. समाजातील पर्यावरण संवर्धन व प्राणी-पक्ष्यांप्रती संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकाराचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.



याच कार्यक्रमात भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा उपाध्यक्ष शालिग्राम पठाडे सर यांना राज्यस्तरीय "शिव छत्रपती प्रेरणा आदर्श समाज प्रबोधन पुरस्कार" प्राप्त झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. समाजप्रबोधन व सामाजिक एकात्मतेसाठी त्यांनी केलेल्या कार्याची उपस्थितांनी प्रशंसा केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब देशमुख होते, तर संजय उकळकर सर, निरबाण सर यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव होणे ही प्रेरणादायी बाब असल्याचे सांगत अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास शहरातील सामाजिक कार्यकर्ते, वाचनालयाचे सभासद, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेलमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा–तालुका विधी सेवा समिती व वकील संघटनेचा संयुक्त उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** तालुका विधी सेवा समिती, पनवेल आणि वकील संघटना, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रम मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम १० मार्च २०२६ रोजी ज्येष्ठ नागरिक हॉल, पनवेल येथे पार पडला.या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा न्यायाधीश चव्हाण यांनी उपस्थित राहून त्यांनी उपस्थितांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) उमा बोराडे यांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या आगमनानंतर दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर ॲड. जान्हवी वाडकर यांनी गणेश वंदना केली. पुढे उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. यानंतर उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणांमधून महिला सक्षमीकरण, न्यायव्यवस्थेतील महिलांचे योगदान तसेच त्यांच्या वाढत्या



नेतृत्वाबाबत मार्गदर्शन केले. मानसशास्त्रज्ञ तथा भूमिका फाउंडेशनचे संचालक डॉ. विशाल गाणार यांनी "मानसिक आरोग्याचे महत्त्व" या विषयावर मार्गदर्शन करताना व्यावसायिक आयुष्यात मानसिक संतुलन राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच ॲड. लीना गजानन पाटील यांनी वुमन इन लॉ या विषयांवर प्रभावी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात विशेष उपस्थिती म्हणून ज्येष्ठ सरकारी वकील ॲड. यशवंत भोपी आणि ज्येष्ठ वकील ॲड. मनोज म्हात्रे यांनी कविता सादर करून कार्यक्रमाची उंची वाढवली. यावेळी वकील संघटना पनवेलचे अध्यक्ष ॲड. रत्नदीप पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करत स्त्रीशक्तीची खरी ताकद अधोरेखित केली व महिला वकिलांच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमादरम्यान न्यायव्यवस्थेत कार्यरत असलेल्या महिला वकिलांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या सोहळ्यास सुमारे ७० महिला उपस्थित होत्या. सर्वांचा सन्मान करण्यात आल्याने वातावरण अत्यंत उत्साही व प्रेरणादायी झाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विधी स्वयंसेविका स्नेहल मनोरे यांनी केले. पनवेल वकील संघटनेच्या सदस्या ॲड. ज्योती उरणकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तालुका विधी सेवा समितीचे प्रतिनिधी म्हणून विधी स्वयंसेवक शैलेश कोंडसकर यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पनवेल वकील संघटनेचे खजिनदार ॲड. धनराज तोकडे, सहसचिव ॲड. दिपाली गावंड, सह खजिनदार ॲड. विशाल डोंगरे, ऑडिटर ॲड. भूषण म्हात्रे, ॲड. विजेंद्र मुंढे, ॲड. विकी दुशिंग, ॲड. सुजाता शेलार, ॲड. प्रियांका वारंगे,तसेच तालुका विधी सेवा समिती, पनवेलचे वरिष्ठ लिपिक हेमंत आंबेतकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

# विधानभवनासह मुंबईतील ५ ठिकाणांना बॉम्ब–मिसाईल हल्ल्याची धमकी ; तपासणीनंतर परिसर सुरक्षित



**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका** : मुंबईतील विधानभवनासह पाच महत्त्वाच्या ठिकाणांवर बॉम्ब व मिसाईलद्वारे हल्ला करण्याची धमकी देणारा ई-मेल गुरुवारी सकाळी प्राप्त झाल्याने सुरक्षा यंत्रणांमध्ये खळबळ उडाली. सकाळी सुमारे ६.५७ वाजता आलेल्या या ई-मेलमध्ये विधानभवन, स्टॉक एक्सचेंज, मुंबई मेट्रो, मुंबई उच्च न्यायालय आणि काही महत्त्वाच्या बँकांवर हल्ला करण्याची धमकी देण्यात आली होती.

धमकीचा ई-मेल मिळताच विधानभवन परिसरात तात्काळ उच्च सतर्कता घोषित करण्यात आली. बॉम्ब शोधक व निकामी पथक (BDDS) तसेच सुरक्षा यंत्रणांनी विधानभवनातील दोन्ही सभागृहांसह सर्व दालने आणि परिसराची सखोल तपासणी केली.

तपासणी सुरू असताना विधानभवनात प्रवेश करणाऱ्या सर्व व्यक्तींना काही काळ थांबविण्यात आले होते. कर्मचारी व इतर कामकाजासाठी आलेल्या लोकांनाही बाहेरच रोखण्यात आले. संपूर्ण तपासणी पूर्ण झाल्यानंतर विधानभवन व परिसर सुरक्षित असल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांकडून देण्यात आली. त्यानंतर विधानसभेचे कामकाज नियमितपणे सुरू करण्यात आले.

# सोशल मीडियाच्या आभासी जगात हरवलेली तरुणाई – डॉ . महेश बनकर

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : उच्च व तंत्र शिक्षण विभाग ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय नाशिक, श्री माणकेश्वर वाचनालय तसेच कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाशिक ग्रंथोत्सवात "सोशल मीडिया आणि आजची युवा पिढी" या विषयावर वैचारिक परिसंवाद उत्साहात संपन्न झाला.

या परिसंवादात प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रा. डॉ. महेश बनकर यांनी सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावावर भाष्य केले. सोशल मीडियामुळे ज्ञानाची कवाडे सर्वांसाठी खुली झाली असून यूट्यूब, इंस्टाग्रामसारख्या माध्यमांमुळे ग्रामीण भागातील तरुणांनाही आपले कलागुण जगासमोर मांडण्याची संधी मिळाली आहे. डिजिटल मार्केटिंग, कंटेंट क्रिएशन आणि इन्फ्लुएंसर मार्केटिंग यांसारखी नवीन करिअर क्षेत्रेही उदयास आली आहेत. शैक्षणिक माहिती व जागतिक घडामोडी




एका क्लिकवर उपलब्ध झाल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

मात्र दुसऱ्या बाजूला सोशल मीडियामुळे तरुणांचे मानसिक आरोग्य धोक्यात येत असल्याची चिंताही त्यांनी व्यक्त केली. इतरांच्या 'फिल्टर' केलेल्या आयुष्याशी तुलना करताना तरुणांमध्ये न्यूनगंड निर्माण होत असून ते तुलनेच्या सापळ्यात अडकत आहेत. आभासी जगातील वाढता वेळ आणि प्रत्यक्ष संवादाची कमतरता यामुळे एकलकोंडेपणा वाढत आहे. सायबर गुन्हेगारी, सायबर बुलिंग, ट्रोलिंग तसेच चुकीच्या माहितीचा प्रसार यामुळेही तरुणांची दिशाभूल होत असल्याचे त्यांनी नमूद केले. रील्स पाहण्यात वेळ वाया गेल्यामुळे अभ्यास, एकाग्रता आणि शारीरिक आरोग्यावर दूरगामी परिणाम होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आजच्या आधुनिक काळात सोशल मीडिया टाळणे शक्य नाही, मात्र त्याचा वापर करताना ठराविक वेळेचे नियोजन करणे आवश्यक आहे. कोणतीही माहिती तपासून मगच शेअर करावी. नियमित वाचन, व्यायाम, चिंतन-मनन आणि छंद यासाठी वेळ देणे आवश्यक आहे. तसेच कुटुंब, संस्कार आणि संस्कृती यांची जोपासना करत सोशल मीडिया हे 'मालक' नसून केवळ एक 'साधन' आहे, हे तरुणांनी लक्षात ठेवावे, असा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुवर्य वि. दा. व्यवहारे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी सोशल मीडिया हे दुधारी शस्त्र असल्याचे सांगत त्याचा संयमाने आणि जबाबदारीने वापर करण्याचे आवाहन केले. तरुणांनी मनाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी नियमित वाचन, चिंतन-मनन आणि टिपणे काढण्याची सवय अंगीकारावी, तसेच गुरुजन, जेष्ठ मंडळी आणि पालकांच्या मार्गदर्शनाचा उपयोग करून जीवनात योग्य दिशा घ्यावी, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

यावेळी व्यासपीठावर सहाय्यक ग्रंथालय संचालक सचिन जोपूळे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अविनाश येवले, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील जगताप, प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, मधुकर शेलार आदी मान्यवर उपस्थित होते.

या परिसंवादात कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड, वैनतेय विद्यालय निफाड आणि कवी कुसुमाग्रज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था निफाड येथील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सुचिता पडोळ, निकिता खैरनार, अजित जाधव, प्राप्ती पवार, रोहिणी खरे, अन्वित जाधव, स्वरा मगर आणि अनुजा देवरे या आठ विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. मेघा जंगम यांनी केले. या कार्यक्रमासाठी परिसरातील पत्रकार, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक तसेच विविध ग्रंथालयांचे पदाधिकारी, वाचक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे जिल्ह्यात गुटख्याची मोठ्या प्रमाणात विक्री ; तरुण पिढी मध्ये गुटखा खाण्याचे प्रमाण अधिक

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : पुणे शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रतिबंधीत गुटख्याची विक्री केली जात असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.अवैध गुटख्याची राजरोस होणारी विक्री पाहून सर्वसामान्य नागरिकांना गुटखा वैध की अवैध,असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.इंदापूर तालुक्यासह जिल्हयात गुटख्याचे पेव फुटले आहे. पुणे जिल्हयातील शहरी भागातून मोठ्या प्रमाणावर



गुटखा विक्रेते दुचाकी वाहनांवर सकाळी ग्रामीण भागात तसेच शहरातील विविध दुकांनावर गुटखा विक्रीसाठी नेताना दिसत आहेत. अवैध गुटख्यातून होणारी मोठी कमाई लक्षात घेउन बहुसंख्य किराणा दुकानदार व पानपट्टी चालक गुटखा विक्री करीत आहेत. पुणे शहरात मध्यंतरी गुटखा विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आल्यानंतर गुटख्याच्या विक्रीला काहीसा लगाम बसेल अस असताना मात्र,त्यानंतर पुन्हा चोरी छुपे गुटखा विक्री सुरूझाली आहे. महिला व अल्पवयीन मुलांमध्ये गुटखा खाण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे.या अल्पवयीन मुलांना व्यसनाधिनतेच्या खाईत लोटण्याचे काम गुटखामाफिया करत आहते.अन्न व औषध प्रशासनाकडून माफियाकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे. प्रशासनाने माफियांविरोधात कठोर पाऊले उचलून कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे.गुटखाविक्रीसाठी विविध क्लुप्त्या गुटखा विक्रेते वाहनातून गुटखा विक्री करण्यासाठी नेतांना तो इतर सामानाखाली झाकून नेण्यात येतो. अनेकदा उदक्तीसह इतर वस्तुसोबत गुटखा विक्री केली जाते. जिल्ह्यात गुटखा विक्रेत्यांची संख्या मोठी असून,सकाळी हे विक्रेते किराणा दुकानदार व पानटपरी चालकांना दुकानापर्यंत सर्विसेस देत आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# उरण पोलिसांची मोठी कारवाई; ४ लाखांच्या हेरॉइनसह एकाला अटक!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर/उरण प्रतिनिधी** : उरण परिसरात अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. धुतुमगाव हद्दीत अंमली पदार्थांची विक्री करण्यासाठी आलेल्या एका इसमाला उरण पोलिसांनी सापळा रचून अटक केली असून, त्याच्याकडून ४ लाख ७ हजार ६०० रुपये किमतीचे हेरॉइन जप्त केले आहे.




जाहेदुर जलील शेख (वय ३५) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, धुतुमगाव येथे एक इसम हेरॉइन विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची खात्रीशीर माहिती उरण पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी परिसरात सापळा रचला. संशयास्पद हालचाली करणाऱ्या जाहेद शेख याला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे १०.१९ ग्रॅम वजनाचे हेरॉइन सापडले. हे अमली पदार्थ २५० लहान पुड्यांमध्ये विभागलेले होते. पोलिसांनी याप्रकरणी एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. ही कारवाई उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय राठोड, पोलीस हवालदार महेंद्र म्हात्रे आणि डी.बी. टीमने यशस्वीरीत्या पार पाडली आहे. या कारवाईमुळे परिसरात अमली पदार्थ विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

# नागपूर नवीन विधानभवनचे काम विहित कालावधीत पूर्ण करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी**
**नागपूर** : नागपूर नवीन विधानभवनचे काम 2028 पर्यंत पूर्ण करण्यात यावे. विधानसभा आणि विधान परिषदेचे सभागृह, मध्यवर्ती सभागृह असलेले मुख्य संकुल, स्वतंत्र प्रशासकीय इमारतीची कामे विहित कालावधीत होण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



विधानमंडळ येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीची बैठक झाली. यावेळी बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव श्रीकर परदेशी आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत नागपूर येथील नवीन विधानभवन मुख्य संकुल व प्रशासकीय इमारत, नेरळ -शिरूर या पुणे मुंबई द्रुतगती महामार्गाला पर्यायी नवीन महामार्गासह, अलिबाग- विरार महामार्गाच्या अटल सेतू , मुंबई गोवा महामार्ग, पुणे मुंबई द्रुतगती महामार्ग जोडणारे विविध नोड व पुणे–शिरूर सहा पदरी उन्नत मार्गाच्या प्रकल्पाबाबत भूसंपादन, मंजुरी प्रक्रिया, निधी तरतुदी याबाबत चर्चा झाली.

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील वाहतुकीचा भार कमी करणाऱ्या नेरळ शिरूर या नवीन महामार्गाबाबात बैठकीत चर्चा झाली. रायगड जिल्ह्यातील कर्जत नेरळ येथून सुरू होणारा हा महामार्ग पुणे -अहिल्यानगर महामार्गावरील शिरूर येथे जोडला जाईल. राज्यातील अनेक भागातून येणाऱ्या वाहनांना सोयीस्कर असा हा महामार्ग असेल. या नियोजित महामार्गासाठी आवश्यक मान्यता व निधी तरतुदी बाबत कार्यवाही केली जावी यादृष्टीने यावेळी सूचना देण्यात आल्या.

यासह वाढणारी वाहतूक आणि भविष्यात वाहनांची संख्या लक्षात घेता, पुणे ते शिरूर या महामार्गावरील सहा पदरी उन्नत मार्ग आणि चार पदरी जमिनीच्या समतल (अॅट ग्रेड) मार्गाचे कामांतील तांत्रिक तपशीलबाबत चर्चा करण्यात आली.

***नागपूर येथील नवीन विधानभवन***

1920 साली बांधण्यात आलेल्या सध्याच्या विधान भवनाच्या जागी तयार होणाऱ्या नवीन विधानभवन मध्ये विधानसभा आणि विधान परिषदेचे सभागृह, मध्यवर्ती सभागृह यासह समिती कक्ष, पत्रकार कक्ष आदी विधिमंडळ व प्रशासकीय कामकाजासाठी सुविधा असलेले मुख्य संकुल यांचे ए, बी आणि सी ब्लॉकच्या 62 हजार 924 चौरस फूट आराखड्याच्या चार मजली मुख्य संकुलास 662 कोटी रुपये व प्रशासकीय इमारतीसाठी 339 कोटी रुपये तरतूद करण्यात येत आहे.

नवीन विधान भवनातील विधानसभेत एकूण 400 आसन क्षमता राहणार असून विधान परिषद सभागृहाची क्षमता 120 तर मध्यवर्ती सभागृहाची आसन क्षमता 700 राहील.

# आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या 22 व्या हप्त्याचे निधी वितरण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील** : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा माहे डिसेंबर 2025 ते मार्च 2026 कालावधीतील 22 वा हप्ता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते दिनांक 13 मार्च, 2026 रोजी सायंकाळी 5.00 वाजता ज्योती-बिष्णु आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक केंद्र, खानापारा गुवाहाटी, आसाम येथून वितरीत होणार आहेत.

केंद्र शासनाने शेतक-यांना निश्चित उत्पन्न देण्याकरीता प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजना माहे फेब्रुवारी, 2019 पासून सुरु केली




आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची 18 वर्षाखालील अपत्ये) रु. 2000/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. 6000/- त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजने अंतर्गत राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना यापुर्वी एकूण 21 हप्त्यांमध्ये सुमारे रू. 39,300 कोटीचा लाभ जमा झालेला आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजनेच्या लाभासाठी केंद्र शासनाकडून लाभार्थीने भूमी अभिलेख नोंदणी अद्यावत करणे, बँक खाते आधार संलग्न करणे, ई-केवायसी प्रमाणिकरण करणे या बाबी बंधनकारक केलेल्या आहेत. राज्यातील सद्यस्थितीत या तीनही बाबीची पूर्तता केलेल्या एकूण 91.19 लाख शेतकरी कुटुंबांना दिनांक 13 मार्च, 2026 रोजी सुमारे रक्कम रुपये 1837.00 कोटी इतक्या रक्कमेचा लाभ त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहे. राज्यातील कृषी विज्ञान केंद्र तसेच जिल्हा, तालुका व ग्राम पंचायत स्तरावर, कृषी उत्पन्न बाजार समिती, विविध कार्यालये, संशोधन केंद्रे, शेतकरी उत्पादक कंपनी (FPCs), शेतकरी उत्पादक संघटना (FPOs), सहकारी पतसंस्था (PACS) याठिकाणी सदरचा समारंभ आयोजित करण्यात येत आहे. नागरी सुविधा केंद्रांवरुनही या संमारभाच्या थेट प्रक्षेपणामध्ये सहभागी होता येईल.

राज्यांमध्ये सर्वदूर कृषी विभाग, महसूल व वने विभाग, तसेच ग्राम विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने सदरचा समारोह साजरा करण्यात येणार आहे. सदरच्या समारोहाचे थेट प्रक्षेपण केंद्र शासनाच्या https://pmindiaweb-cast.nic.in या लिंक वरून होणार आहे. सदरच्या लिंकचा वापर करून राज्यातील जास्तीत जास्त शेतकरी बंधु भगिनींनी या समारोहामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# प्रा .श्री विष्णू नारायण दाभाडे यांना भारत सरकार कडून मिळाले पेटंट

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी:** भीमराव गावडे तिरुपती उच्च माध्यमिक आश्रम शाळा येथील भौतिक शास्त्राचे प्राध्यापक श्री. दाभाडे विष्णू नारायण यांना संशोधन करत असताना या विषयांमध्ये मशीन लर्निंग वापरून निर्बंधित चेहरा ओळख आणि पडताळणीसाठी आय ओटी आधारित प्रणाली आणि पद्धत* या विषयासाठी भारत सरकार कडून पेटंट जाहीर करण्यात आले त्याबद्दल तिरुपती प्रशिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष साहेब श्री. राठोड शामराव ( माझी जिल्हा परिषद



सदस्य.बीड ) व संस्थेचे सचिव आदरणीय श्री.राठोड गोरक्षनाथ यांनी तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य श्री दाभाडे आर.एस.सर व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. खरसाडे आर.एस.सर्व शिक्षक व शिक्षकत्तर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या.

# के आर एम महिला महाविद्यालयात अर्थदर्पणचे अनावरण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी -प्रकाश गवारे :** महिला शिक्षण संस्था नांदेड संचलित, के.आर.एम.महिला महाविद्यालय, वजीराबाद, नांदेड.येथील अर्थशास्त्र विभागातर्फे "अर्थदर्पण" या भीतीपत्रक अनावरणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या अर्थदर्पणचे अनावरण महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विजया देशमुख व नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयाचे डॉ महेंद्र बेंबळगे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थिनी प्रिया खवास आणि शिवानी सरोदे यांनी भितीपत्रक तयार करून भारतातील वस्तू आणि सेवा कर, त्याचे प्रकार त्याचे दर आणि वस्तू आणि सेवा कराचे फायदे याविषयी माहितीपूर्ण मांडणी केली.

मनीषा निवडंगे आणि धरती घोंगडे या विद्यार्थिनींनी जगातील विविध देशातील चलने आणि त्या चलनांची चिन्हे यावर आकर्षक असे भितीपत्रक तयार केले.विद्यार्थ्यांनी आपल्या



भितीपत्रकाचे सादरीकरण करताना विषयाचे सखोल ज्ञान आणि सर्जनशीलता दाखविली. प्राचार्या डॉ विजया देशमुख यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांना अशा शैक्षणिक आणि सर्जनशील उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ.आरती राणे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा मनोज देशमुख यांनी मानले.या कार्यक्रमास डॉ योगिता पवार, डॉ.सीमा शिंदे, डॉ अग्रवाल व इतर प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# नाविन्यपूर्ण प्रयोगांतून शिक्षणाची गंगा घराघरात पोहोचवणारे दीपक बावस्कर 'आदर्श शिक्षक' पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,फर्दापूर तांडा येथील उपक्रमशील शिक्षक दीपक शिवाजी बावस्कर यांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल 'ध्येय एज्युकेशन फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य' या संस्थेचा राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२५' जाहीर झाला आहे. येत्या २९ मार्च रोजी एका गौरव सोहळ्यात त्यांना या सन्मानाने गौरविण्यात येणार आहे. बहुआयामी उपक्रमांतून शाळेचा कायापालट दिपक बावस्कर यांनी केवळ अध्यापनच नव्हे, तर



विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला आहे. त्यांच्या कार्याचे प्रमुख पैलू खालीलप्रमाणे आहेत:

चिमणी घरटी उपक्रम: टाकाऊ वस्तूंपासून 'टिकाऊ चिमणी घरटी' तयार करून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण केली आहे.

ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी कार्य: समाजातील वंचित घटकातील, विशेषतः ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी विशेष प्रयत्न करून त्यांना मुख्य प्रवाहात आणले आहे.

शाळा बाह्य मुलांचा शोध: वाबळेवाडी सारख्या आदर्श शाळांना भेटी देऊन त्या धर्तीवर आपल्या शाळेत गुणवत्तापूर्ण बदल घडवून आणले आहेत.

वृक्षारोपण व परिसर विकास: शाळेच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून शाळा बोलकी आणि हरित बनवली आहे.डिजिटल शिक्षण: आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना डिजिटल माध्यमांतून शिक्षण देण्यावर त्यांनी भर दिला आहे.

**यशाचे श्रेय विद्यार्थ्यांना समर्पित**

या निवडीबद्दल बोलताना श बावस्कर म्हणाले की, "हा पुरस्कार केवळ माझा सन्मान नसून माझ्या शाळेतील विद्यार्थी, सहकारी शिक्षक आणि माझ्यावर विश्वास टाकणाऱ्या पालकांचा गौरव आहे. मिळालेली ही पोचपावती मला भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची ऊर्जा देईल".त्यांच्या या यशाबद्दल फर्दापूर तांडा येथील ग्रामस्थांनी, त्यांचे आप्तेष्ट, सहकारी, आणि शिक्षक आणि विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# रायगड जिल्हा परिषदेत ऐतिहासिक बिनविरोध निवड! भाजपचा पहिला अध्यक्ष मंगेश वाकडीकर, राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष मधुकर पाटील

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा :** रायगड जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपचा अध्यक्ष निवडून आला! गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथील विशेष सभेत भाजपचे मंगेश रामचंद्र वाकडीकर यांची अध्यक्षपदी आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मधुकर मारूती पाटील यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांनी दोघांच्या निवडीची घोषणा करत सभागृहात टाळयांचा कडकडाट झाला. महायुतीची सत्ता स्थापन जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपला १५, राष्ट्रवादीला १६ आणि शिवसेना (शिंदे गट) ला २१ जागा मिळाल्या, पण स्पष्ट बहुमत कोणालाही नव्हते. वरिष्ठ पातळीवरील निर्णयानुसार भाजप,



राष्ट्रवादी आणि शिवसेना (शिंदे गट) यांनी महायुती करत सत्ता हातात घेतली. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी वाकडीकर यांचे नाव जाहीर केले, तर राष्ट्रवादीने पाटील यांना उपाध्यक्षपद दिले.

**"सत्तेचे रोटेशन फॉर्म्युला ठरला"**

पहिली सव्वा वर्षे भाजपकडे, पुढील सव्वा वर्षे राष्ट्रवादीकडे आणि शेवटची अडीच वर्षे शिवसेना (शिंदे गट) कडे. अर्ज दाखल वेळी मंत्री आदिती तटकरे, आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, माजी खासदार धैर्यशील पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे, शिवसेना नेत्या मानसी दळवी, आस्वाद पाटील, चित्रा पाटील,सचिन राऊळ, विकास गोगावले यांसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.


**"राजकीय नाराजी आणि सन्नाटा"**

शिवसेना (शिंदे गट) ला महायुतीत सामावण्याचा निर्णय वरिष्ठांकडून झाला, तरी काही नवनिर्वाचित सदस्यांच्या चेहऱ्यावर नाराजी उमटली. सभागृहात अपेक्षित जोशऐवजी निःशब्द सन्नाटा पसरला, जो राजकीय तणाव दर्शवतो.

खासदार सुनील तटकरे यांचा निर्धारमंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, "राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये महायुती एकत्र येऊन विकासाला गती देणार. रायगडमध्ये तिन्ही पक्ष जिल्ह्याच्या प्रगतीसाठी एकजूट राहतील. सर्वांच्या पाठिंब्याबद्दल आभार!" ही निवड रायगडच्या विकासाला नवसंजन देणारी असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महायुतीचे हे सत्तास्थापन रायगडच्या स्थानिक प्रशासनाला नवदिशा देईल, असा अंदाज आहे.

# पनवेलमध्ये 'गूज मनीचे' नाट्यप्रयोगाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** भारतीय संस्कृतीतील अजरामर महाकाव्ये असलेल्या रामायण आणि महाभारतातील नायिकांच्या अंतर्मनाचा वेध घेणारा 'गूज मनीचे' हा संशोधनाधारीत आणि प्रयोगशील नाट्यप्रयोग बुधवारी पनवेलमध्ये उत्साहात संपन्न झाला. नादकला थिएटर अँड फिल्म्स निर्मित या अभिनव नाटकाचा शुभारंभ आणि पहिला प्रयोग आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या विशेष कार्यक्रमाचे आयोजन



करण्यात आले होते. या प्रयोगाला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या नाट्यप्रयोगाची मूळ संकल्पना डॉक्टर मेधा किरीट यांची असून, लेखन व दिग्दर्शन साक्षी परांजपे यांनी केले आहे, तर प्रिया सावंत या प्रयोगाच्या सहनिर्मात्या आहेत. रामायण आणि महाभारतातील चिरंतन नायिकांचे विचार, त्यांच्या भावना आणि त्यांचे अंतर्मन आजच्या काळाशी सुसंगत पद्धतीने या प्रयोगातून अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आले. हा प्रयोग केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून, एक सखोल संशोधनावर आधारित नाट्यकृती असल्याने प्रयोगापूर्वीच रसिक प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. प्रत्यक्षात प्रयोगादरम्यान नायिकांच्या व्यक्त होणाऱ्या भावनांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले. या प्रयोगावेळी माजी खासदार किरीट सोमैया, मेधा किरीट सोमैया, प्रिया सावंत, साक्षी परांजपे, अभिषेक पटवर्धन, शामनाथ पुंडे, चिन्मय समेळ, वैभव बुवा, आदित्य उपाध्ये, निखील गोरे, सुनीता खरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या यशस्वी आयोजनासाठी भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांचे आयोजकांच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले.

# मागणी पूर्ण न झाल्यास नगरपरिषदेला "ताळा ठोको"आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर/दिग्रस प्रतिनिधी** : बजरंग नगर, वार्ड क्र. ९ येथील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते गजानन बाबाराव गंडाळे यांनी दिग्रस नगरपरिषदेला निवेदन देत ८ दिवसांत मागणी पूर्ण न झाल्यास नगरपरिषद कार्यालयाला 'ताळा ठोको आंदोलन' करण्याचा इशारा दिला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बजरंग नगर येथे नालीचे खोदकाम करण्यात आले असून त्यानंतर नालीचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत ठेवण्यात आले आहे. यासंदर्भात अर्जदार गजानन गंडाळे यांनी सुमारे ८ महिन्यांपूर्वी व्हॉट्सअॅपद्वारे दिग्रस नगरपरिषदेला नालीचे खोदकाम व बांधकाम पूर्ण करण्याबाबत अर्ज दिला होता.

यानंतर दि. २७.०२.२०२६ रोजी पुन्हा दिग्रस नगरपरिषदेला नालीचे बांधकाम तातडीने करण्यात यावे, असे निवेदन देण्यात आले होते. तसेच मागणी पूर्ण न झाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा देत दि. ०३.०२.२०२६ रोजी पत्र देण्यात आले होते.

अर्जदारांच्या आरोपानुसार, हे निवेदन अक्षय राठोड (बांधकाम अभियंता, दिग्रस नगरपरिषद) यांनी नगराध्यक्ष पंचशीला इंगोले यांच्यापर्यंत पोहोचवलेच नाही, असा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.दरम्यान, या मागणीसाठी गजानन गंडाळे यांनी दि. १०.०२.२०२६ रोजी दिग्रस नगरपरिषद कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र पोलिस प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांनी वेळेत हस्तक्षेप करून त्यांना आत्मदहन करण्यापासून रोखले, असेही त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.या संदर्भात नगराध्यक्ष पंचशीला इंगोले यांनी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव घेऊन लवकरच नालीचे बांधकाम करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. मात्र आश्वासन देऊन एक ते दीड महिना उलटूनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही, असा आरोप गजानन गंडाळे यांनी केला आहे.

तसेच, नगराध्यक्षांनी दिलेले आश्वासन हे केवळ "केराची टोपली दाखवण्यासारखे" ठरले असल्याची टीकाही त्यांनी केली आहे.येत्या ८ दिवसांत दिग्रस नगरपरिषद प्रशासनाने ठोस निर्णय न घेतल्यास नगरपरिषद कार्यालयाला 'ताळा ठोको आंदोलन' करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते गजानन बाबाराव गंडाळे यांनी दिला आहे.

# रायगड जिल्हा परिषदेत ऐतिहासिक बदल; प्रथमच भाजपचा अध्यक्ष विराजमान

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** रायगड जिल्हा परिषदेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक यश मिळवत जिल्ह्यात नवे राजकीय समीकरण निर्माण केले आहे. पनवेल तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या ८ पैकी ८ जागांवर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार विजयी झाले असून या विजयामुळे रायगड जिल्हा परिषदेत प्रथमच भारतीय जनता पक्ष निर्णायक भूमिकेत आला आहे. परिणामी जिल्हा परिषदेत भाजपचा अध्यक्ष विराजमान झाला असून जिल्ह्याच्या राजकारणात हा मोठा आणि ऐतिहासिक बदल मानला जात आहे. या बदलामुळे भविष्यात रायगड जिल्हा परिषदेत भाजपची राजकीय समीकरणे अधिक मजबूत होतील, असा अंदाज राजकीय विश्लेषकांकडून व्यक्त केला जात आहे.



याचबरोबर पनवेल पंचायत समितीमध्येही भाजपने प्रथमच सत्ता मिळवली आहे. पनवेल पंचायत समितीच्या १६ पैकी १५ जागांवर भाजपच्या उमेदवारांनी विजय मिळवत स्पष्ट वर्चस्व सिद्ध केले आहे. त्यामुळे पनवेल तालुक्यात भाजपची संघटनात्मक ताकद अधिक बळकट झाल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, नुकत्याच पार पडलेल्या पनवेल महानगरपालिका निवडणुकीतही भारतीय जनता पक्षाने एकहाती विजय मिळवत शहरातील राजकारणात आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. या विजयाची सुरुवात भाजपा नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या प्रभाव असलेल्या प्रभागातून झाली, जिथे दोन नगरसेवक बिनविरोध निवडून आले. त्यानंतर पनवेल शहर परिसरातून आणखी चार नगरसेवक बिनविरोध निवडून येत भाजपच्या संघटनात्मक ताकदीची प्रचिती दिली.ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी सन २०२५ मध्ये अनेक नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सरपंच तसेच हजारो कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या प्रवेशानंतर पनवेल तालुक्यात भाजपच्या संघटनात्मक बळात मोठी वाढ झाली. विशेष म्हणजे प्रितम म्हात्रे यांच्या प्रवेशानंतर पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात भाजपाला पडलेल्या मतांमध्ये विधानसभा २०२४ च्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा परिषद २०२६ मध्ये ३०,००० पेक्षा अधिक मतांची वाढ झाली. त्यामुळे संघटनात्मक बळ अधिक मजबूत होऊन या निवडणुकीत हा विजय शक्य झाला. भाजपचे आमदार असताना जिल्हा परिषद गण गव्हाण, वडघर, केळवणे, वावंजे, वावेघर, पळस्पे आदी पारंपरिक विभाग हे शेतकरी कामगार पक्षाच्या ताब्यातच होते. प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या भाजप प्रवेशानंतर गावोगावी जाऊन भाजपची विचारधारा, केंद्र व राज्य सरकारच्या विकासकामांची माहिती तसेच तरुणांसाठी रोजगार निर्मितीचे नियोजन प्रभावीपणे मतदारांपर्यंत पोहोचवण्यात आले. परिणामी पारंपरिक मतदारांमध्ये सकारात्मक मतपरिवर्तन होऊन भाजपच्या उमेदवारांना स्पष्ट जनादेश मिळाला.

याबाबत प्रतिक्रिया देताना भाजपा नेते प्रितम जनार्दन म्हात्रे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते रामशेठ ठाकूर आणि ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली तसेच आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या योग्य सहकार्यामुळे हा ऐतिहासिक विजय आम्हाला मिळवता आला. एकत्रित संघटन कौशल्यामुळे भाजपची विचारधारा आम्ही शेकापच्या पारंपारिक मतदारांना पटवून त्यांचे मतपरिवर्तन करू शकतो. कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमांमुळे आणि जनतेच्या विश्वासामुळे भारतीय जनता पक्षाला हे यश मिळाले. भविष्यातही यापेक्षा मोठा विजय मिळवत विकासाच्या माध्यमातून भारतीय जनता पक्ष अधिक बळकट होईल, असा आम्हाला विश्वास आहे."

# प्राचार्य धुमाळ सर यांच्या नेतृत्वाखाली श्री महावीर जैन विद्यालयात कॉपीमुक्त परीक्षेसाठी कडक बंदोबस्त

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : दहावीच्या बोर्ड परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी लासलगाव येथील श्री महावीर जैन विद्यालयाने कडक भूमिका घेतली आहे. प्राचार्य धुमाळ सर यांच्या नेतृत्वाखाली परीक्षा केंद्रावर अभूतपूर्व शिस्त आणि काटेकोर तपासणीची अंमलबजावणी करण्यात येत असून विद्यालय कॉपीमुक्त अभियानात आघाडीवर असल्याचे चित्र दिसून येत आहे.



**यावर्षी परीक्षा सीसीटीव्हीच्या निगराणीखाली घेण्यात येणार असल्याची सूचना विद्यार्थ्यांना अगोदरच देण्यात आली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यानुसार मानसिक तयारी केली होती कॉपीमुक्त वातावरण राखण्यासाठी शाळा प्रशासनाने कडक उपाययोजना केल्या असून आतापर्यंत सर्वांनी कॉपीमुक्त अभियानात सक्रिय सहभाग घेत उत्कृष्ट सहकार्य केले आहे. पत्रकार, पालक आणि विद्यार्थी यांच्या सहकार्यामुळे परीक्षा शांत व सुरळीत वातावरणात पार पडत आहेत**

**— प्राचार्य धुमाळ सर**

परीक्षेला येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावरच प्रथम तपासणी केली जात आहे. प्रवेशद्वारावर शिक्षक व कर्मचारी तैनात राहून विद्यार्थ्यांच्या पिशव्या, खिसे तसेच संशयास्पद वस्तूंची तपासणी करत आहेत. त्यानंतरच विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्राच्या इमारतीत प्रवेश दिला जात आहे.

याशिवाय वर्गात प्रवेश करण्यापूर्वी विद्यार्थ्यांची पुन्हा एकदा सखोल तपासणी केली जाते. विद्यार्थ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या चिठ्ठ्या, मोबाईल किंवा अन्य साहित्य नसावे यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे. परीक्षेची पारदर्शकता राखण्यासाठी विद्यार्थ्यांचे बूट व मोजे वर्गाबाहेर काढून ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली असून कॉपी लपवण्याची कोणतीही शक्यता राहू नये यासाठी प्रशासन सतर्क आहे.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे परीक्षा केंद्रावर अत्यंत शिस्तबद्ध व पारदर्शक वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षक व कर्मचाऱ्यांची सतत देखरेख असल्याने कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारांना आळा बसत आहे. प्राचार्य धुमाळ सर यांनी शिक्षकांना स्पष्ट सूचना देत "कॉपीला शून्य सहनशीलता" धोरण अवलंबले असून प्रत्येक विद्यार्थ्याने प्रामाणिकपणे परीक्षा द्यावी यावर भर दिला आहे.

या कडक उपाययोजनांमुळे विद्यार्थीही नियमांचे पालन करत प्रामाणिकपणे परीक्षा देत आहेत. पालक व स्थानिक नागरिकांकडून विद्यालयाच्या या शिस्तप्रिय भूमिकेचे कौतुक केले जात असून कॉपीमुक्त परीक्षेसाठी घेतलेल्या या निर्णयामुळे श्री महावीर जैन विद्यालय, लासलगाव येथे प्रामाणिक परीक्षेचा आदर्श उभा राहत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# पोहंडुळचे स्काउट्स आणि गाईड्स राज्यपुरस्कारासाठी पात्र

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे/महागाव यवतमाळ** : महाराष्ट्र राज्य भारत स्काउट्स आणि गाईड्स संस्थेतर्फेघेण्यात आलेल्या शैक्षणिक सत्र २०२५-२६ राज्य पुरस्कार चाचणीपरिक्षेचा निकाल जाहिर झाला आहे.यात महागांव तालुक्यातील एकमेव शाळा श्रीमती अनुसयाबाईज. ए. पाटील विद्यालयातील १३ स्काउट्स आणि गाईड्स यांनीउल्लेखनीय यश संपादन केले. त्यामध्ये शिवम अनिल कुन्हाडे, दर्शनसुरेश जाधव, धनराज सुनिल शिंदे, शेख आदिल शे. इकबाल, जहेदशेख रफिक, कु. तन्वी संतोष नागणवार, कु· आरुषी प्रमोद वानखडे,कु पौर्णिमा विजय वानखडे, कु. साठी रवि जाधव, कु· श्रेया माणिकराव कहे, कु. सलोनी इंदल राठोड, कु. वंशिका ईश्वरदास घोरपडे,कु. श्रेया राजेंद्र घोरपडे, इत्यादी स्काउट्स आणि गाईड्स यांनीराज्यस्तरीय पुरस्कारास पात्र होण्याचा मान मिळविला. त्यांना स्काउटमास्टर श्री. चिंतामन



सिंगन यांचे मार्गदर्शन तर स्काउट मास्टरश्री.अतुल वानखेडे यांनी सहकार्य केले. जिल्हा संघटक श्री. गजानन गायकवाड सर तसेच संघटिका मनिषा तराळे मॅडम यांनी पुढीलवाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी पोहंडूळ परिसर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अँड. श्री. पी.व्ही. गाडबैले साहेब, उपाध्यक्ष श्री. दादासाहेब गाडवेल, सचिवश्री. नानाभाऊ गाडबैले, मुख्याध्यापक श्री. श्रीकांत चाकले.सर्व शिक्षक वृंदानी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# सुप्रभात महिला मंडळात सावित्रीबाई फुले पुण्यतिथी आणि जागतिक महिला दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** विक्रोळी कन्नमवार नगरातील सुप्रभात महिला मंडळात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी आणि जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इंडियन मेडीकल असोशिएशन एनईबीएसचे अध्यक्ष हरिशचंद्र पांचाळ व विक्रोळीतील सेवाभावी डॉ.जयश्री पांचाळ, मंडळाच्या अध्यक्षा अनुराधा कल्याणकर,सेक्रेटरी आसावरी भोईटे,खजिनदार प्राची रेडकर प्रतिभा धुंदुर आदि मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी महिलांच्या



समस्यांबाबत इंडियन मेडीकल असोशिएशन एनईबीएसच्या वतीने विशेष वैद्यकीय शिबीर घेण्यात आले. डॉ.सोनल परेलकर(सर्जन), डॉ. मधुश्री वेंकट,गायनॅकॉलॉजिस्ट यांनी महिलांच्या वैद्यकीय चाचण्या घेतल्या.व त्यांना मार्गदर्शन केले.

# सिद्धार्थ विद्यालयात यशवंतराव चव्हाण जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले /लाखनी भंडारा** : लाखनी - दिनांक १२ मार्च २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त सिद्धार्थ विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय सावरी/मुरमाडी येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी परिचय करून देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कु. स्वाती वासनिक होत्या, तर प्रा. कु. सुरेखा गभणे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

अध्यक्षीय भाषणात स्वाती वासनिक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, सहकार, उद्योग, शेती, पायाभूत सुविधा आणि सांस्कृतिक विकास या क्षेत्रांवर विशेष भर दिला. त्यांनी ज्या-ज्या पदांवर काम केले त्या प्रत्येक पदावर प्रामाणिकपणा,



दूरदृष्टी आणि लोकहिताची भूमिका कायम ठेवली, त्यामुळे ते महाराष्ट्राच्या राजकारणातील एक आदर्श नेतृत्व ठरले. प्रमुख पाहुण्या प्रा. सुरेखा गभणे यांनी देखील आपल्या मनोगतातून यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. यावेळी विद्यालयातील शिक्षक विकास काशिवार, विजय रिनाईत, सुभाष ठाकरे, आशिष सिंगनजुडे, भरत राऊत, मनोज खोब्रागडे, एच. एच. मेमन, शिरीष लोगडे, वंदना आगाशे, मनीषा सुखदेवे, स्मिता आगाशे, कविता साठवणे आदी शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कु. प्रतिभा अगळे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम् गीताने करण्यात आली.

# आमदार आदितीताई तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित** : श्रीवर्धन मंत्री महिला व बालविकास महाराष्ट्र राज्य तथा आमदार आदितीताई तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आज उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात विविध आजारांबाबत मोफत तपासणी व तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आले.



या शिबिरामध्ये त्वचारोग, गुप्तरोग, मणक्याचे आजार, मधुमेह, रक्तदाब, थायरॉईड, हृदयरोग, नेत्रतपासणी तसेच कर्करोग अशा विविध आजारांवरील तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी करून आवश्यक ते वैद्यकीय मार्गदर्शन दिले.या उपक्रमासाठी तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल आणि वैद्यकीय महाविद्यालय नेरूळ येथील तज्ज्ञ डॉक्टरांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच हे शिबिर राष्ट्रवादी काँग्रेस श्रीवर्धन तालुका व शहर यांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.या महाआरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ३५० पेक्षा जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. मोफत आरोग्य तपासणी आणि तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

# भुमि अभिलेख विभागाची घीसाडघाई शेत मोजणी च्या कामात हयगय

**दैनिक युवक आधार**

**अतुल गोंडाणे /चांदुर रेल्वे तालुका प्रतिनिधी :** शेतीच्या धुरे बांधाचे वादात अनेक ठिकाणी शेतकऱ्यात वाद होऊन. प्रसंगी जिव जाण्याचे प्रकार घडत असल्याचे शेतकरी सर्वश्रुत आहे म्हणून अनेक शेतकरी पदरमोड करून शेती मोजणी करण्याचे नियोजन करून वादविवाद पासून दूर राहाणयाचा प्रयत्न करतात मात्र भुमि अभिलेख प्रशासन मोजणी कामात हयगय करुन प्रामाणिक शेतकऱ्यांचे मनसुब्यांवर पाणी फिरविण्याचे काम करित असल्याची शंका निर्माण होत आहे.चादुर रेल्वे तालुक्यातील धोत्रा येथिल शेतकरी अशोकराव गोंडाने यांचे मौजा धोत्रा येथिल सर्वे गट क्रमांक 73 स्वमालकीचे शेती मोजणी करिता चांदुर रेल्वे भूमी अभिलेख उप अधीक्षक कार्यालयात रितसर पैसे भरना करून मोजणीचे नियोजन ठराविक कालावधी नंतर मोजणी करण्यात आली . मात्र सदर शेतकऱ्यांचे समाधान झाले नाही अशी स्थिती



आहे . शेतकरी गोंडाने यांचे सांगण्यानुसार त्यांची शेती 7 बारा नुसार वाहितीत नसुन माझे शेत गेले तरी कुठे याचाच निर्णय व्हावा समाधान व्हावे या उद्देशाने शेत मोजणी केली मात्र मोजणी करता कर्मचारी यांनी केवळ एका तासात मोजणी प्रक्रिया पार पाडण्याचा विक्रम केला असल्याचा आरोप शेतकरी गोंडाने यांनी केला आहे भुमि अभिलेख च्या शेत मोजणी प्रक्रिया बाबत हजारो तक्रारी असल्याचे ऐकीवात आहे करिता जिल्हा प्रशासन भुमि अभिलेख कार्यप्रणाली सुधारणा करण्याची मागणी शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे

# मडकोना येथील प्रज्वल गोठे यांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/जितेंद्र खोडे :** ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी उत्साह निर्माण व्हावा या उद्देशाने राष्ट्रीय क्रांतिकारी विचार महासंघ व मदतगार फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने यवतमाळ तालुक्यातील मडकोना येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ.निताताई हारगोडे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे राष्ट्रीय क्रांतिकारी विचार महासंघाचे मुख्यसंयोजक रुस्तम शेख यांच्या उपस्थित आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी मडकोना येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मडकोना केंद्र भारी पंचायत समिती यवतमाळ अर्तगत वर्ग ५ मध्ये शिकत




असलेला प्रज्वल दिनेश गोठे हा विद्यार्थी जिल्हास्तरावर महादिप परीक्षेत उत्तीर्ण होऊन विमानवारी साठी पात्र ठरल्याबद्दल राष्ट्रीय क्रांतिकारी विचार महासंघाचे मुख्य संयोजक रुस्तम शेख यांच्या हस्ते प्रज्वल गोठे यांचा पुष्पगुच्छ,ट्रॉफी व अग्निपंख पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला,या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती ज्योती पिंजरकर,विद्यार्थ्यांचे पालक श्री. दिनेश गोठे (स्थापित्य अभियांत्रीक सहाय्यक जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग कळंब,वर्ग शिक्षिका मरसकोल्हे मॅडम,श्रीमती शिरभाते मॅडम,श्री. तामगाडगे सर,श्रीमती मंगाम मॅडम,श्रीमती नैना भोयर इ. मान्यवर व शिक्षक वृंद उपस्थित होते.भविष्यात कोणताही विद्यार्थी आर्थिक परिस्थिती मुळे शिक्षणा पासून वंचित राहू नये या उद्देशाने मदतगार फाऊंडेशनच्या माध्यमातून गरीब, होतकरू ,हुशार विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्यात येईल अशी माहिती राष्ट्रीय क्रांतिकारी विचार महासंघाचे मुख्य संयोजक रुस्तम शेख यांनी दिली .

# निफाड तहसीलमध्ये 'शेतकरी हक्क जागर' उपक्रम; भिंतीवर उभा राहिला महसुलाचा संवाद-सेतू

## 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' अंतर्गत अभिनव उपक्रम; राज्यासाठी ठरू शकतो आदर्श

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : शासनाच्या विविध महसुली व शेतकरी कल्याणाच्या योजना थेट आणि पारदर्शकपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचाव्यात या उद्देशाने निफाड तहसील कार्यालयाने 'शेतकरी हक्क जागर आणि शेतकऱ्यांसाठी महसूल संवाद-सेतू' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' अभियानांतर्गत तहसील कार्यालयाच्या आवारातील भिंतीवर विविध योजनांची माहिती आकर्षक व समजण्यास सोप्या स्वरूपात प्रदर्शित करण्यात आली आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन बुधवारी (दि. ११ मार्च २०२६) सकाळी ११ वाजता प्रांताधिकारी डॉ. शशिकांत



मंगरुळे यांच्या हस्ते झाले. तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारण्यात आला आहे. महसूल विभागाशी संबंधित विविध योजना, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि लाभाची माहिती एका नजरेत उपलब्ध व्हावी या उद्देशाने ही माहिती भिंतीवर मांडण्यात आली आहे. त्यामुळे तहसील कार्यालयात येणाऱ्या शेतकऱ्यांना योजनांची माहिती मिळवण्यासाठी वेगवेगळ्या कक्षांमध्ये फिरण्याची गरज भासणार नाही.या उपक्रमामुळे शासन आणि शेतकरी यांच्यातील संवाद अधिक सुलभ होण्यास मदत होणार असून शेतकऱ्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. त्यामुळे निफाड तहसीलचा हा उपक्रम राज्यासाठी आदर्श ठरू शकतो, अशी चर्चा प्रशासन व शेतकरी वर्गात सुरू आहे.

या वेळी तहसीलदार विशाल नाईकवाडे, निवासी नायब तहसीलदार राहुल मुळीक, प्रशासन नायब तहसीलदार बाबासाहेब खेडकर, नायब तहसीलदार सुनील गांगुर्डे, नायब तहसीलदार सविता पठारे, सब-रजिस्ट्रार दिपाली जगताप, विजय दरेकर यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

> **"शेतकऱ्यांना शासनाच्या योजनांची माहिती सहज आणि पारदर्शक पद्धतीने मिळावी यासाठी 'शेतकरी हक्क जागर' हा उपक्रम सुरू केला आहे. तहसीलमध्ये येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला एका नजरेत सर्व माहिती मिळावी हा यामागचा उद्देश आहे."**
> **— विशाल नाईकवाडे, तहसीलदार, निफाड**
>
> **"महसूल विभागाच्या योजना लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचणे अत्यंत महत्त्वाचे आहे. निफाड तहसीलने सुरू केलेला 'महसूल संवाद-सेतू' हा उपक्रम प्रशासन आणि शेतकरी यांच्यातील संवाद अधिक मजबूत करणारा असून इतर तालुक्यांसाठीही प्रेरणादायी ठरेल."**
> **— डॉ. शशिकांत मंगरुळे, प्रांताधिकारी, निफाड**
>
> **"तहसीलमध्ये आल्यावर कोणती योजना आहे, अर्ज कसा करायचा आणि कोणती कागदपत्रे लागतात याची स्पष्ट माहिती मिळत नव्हती. आता भिंतीवर सर्व माहिती दिसत असल्याने योजनांचा लाभ घेणे सोपे होणार आहे."**
> **— विजय दरेकर, शेतकरी**

# ग्राहक दिन 2026: एअरटेलची ग्राहक-केंद्रित संस्कृती अधिक बळकट

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग :** दूरसंचार क्षेत्रातील आघाडीची कंपनी Bharti Airtel (एअरटेल) ने आज 'ग्राहक दिन 2026' निमित्त ग्राहकांच्या समस्या समजून घेणे आणि सेवा अनुभव अधिक सुधारण्याच्या उद्देशाने विशेष उपक्रम राबवला. या उपक्रमांतर्गत कंपनीने ग्राहकांना मिळणाऱ्या सेवांचा दर्जा उंचावणे आणि मोठ्या प्रमाणावर ग्राहकांच्या अडचणींचे निराकरण करण्यावर भर दिला.

या मोहिमेत नेतृत्व पातळीपासून ते कार्यविषयक तज्ज्ञांपर्यंत सुमारे 20 हजार एअरटेल कर्मचारी प्रत्यक्ष क्षेत्रात उतरले. त्यांनी आघाडीच्या तांत्रिक टीमसोबत काम करत ग्राहकांशी थेट संवाद साधला. क्षेत्र अभियंत्यांसोबत घरे व दुकाने भेट देणे, रिटेल आणि सेवा केंद्रांमध्ये ग्राहकांशी चर्चा करणे अशा माध्यमांतून



ग्राहकांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला

एअरटेलमध्ये 'ग्राहक दिन' हा संस्थेसाठी आत्मपरीक्षणाचा दिवस मानला जातो. या दिवशी कंपनी स्वतःला एक महत्त्वाचा प्रश्न विचारते — "आपण आपल्या ग्राहकांसाठी अजून काय करू शकतो?"

या उपक्रमाबाबत बोलताना Shashwat Sharma, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, Airtel India यांनी सांगितले की, "ग्राहक दिन हा आम्हाला ग्राहकांचे म्हणणे सखोलतेने ऐकण्याची, स्वतःला आव्हान देण्याची आणि तत्परतेने कृती करण्याची जबाबदारी आठवण करून देतो. ग्राहकांच्या समस्या सोडविणे, सेवा अनुभव अधिक सुलभ करणे आणि लाखो ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा सातत्याने उंचावणे ही आमची वचनबद्धता आहे."

ग्राहकांच्या गरजांवर आधारित नवोपक्रम एअरटेलच्या कार्यपद्धतीच्या केंद्रस्थानी आहेत. स्पॅम आणि फसवणूक प्रतिबंधक प्रणाली अधिक मजबूत करणे, एअरटेल ॲपमधील सुधारित सुविधा तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित साधनांचा वापर करून ग्राहकांना अधिक सुलभ डिजिटल सेवा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न कंपनीने केले आहेत.

एअरटेलच्या मते, ग्राहक अनुभव सुधारणा ही एकदाच होणारी प्रक्रिया नसून सातत्याने चालणारी मोहीम आहे. ग्राहकांच्या प्रतिक्रिया लक्षपूर्वक ऐकून त्यावर ठोस कृती करत प्रक्रिया अधिक सोपी करणे, अडथळे दूर करणे आणि विश्वासार्ह व प्रतिसादक्षम सेवा देणे यावर कंपनी भर देत आहे.

'ग्राहक दिन' या उपक्रमामुळे संपूर्ण संस्था एका उद्दिष्टासाठी एकत्र येते — ग्राहकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी संस्कृती निर्माण करणे. कंपनीचा विश्वास आहे की, प्रत्येक निर्णयाची सुरुवात आणि शेवट ग्राहकांच्या हितापासूनच व्हावा.

# निराधारांचा वाली : नवेगावबांधचे विक्रमसिंह पवार ; 'गुपचूप' विकून जोपासताहेत माणुसकीचा धर्म, अनाथ वृद्धांसाठी ठरले देवदूत!"

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : नवेगावबांध तालुकाअर्जुनी मोरगाव जिल्हा गोंदिया आजच्या कलियुगात जिथे रक्ताची नाती पैशापुढे फिकी पडत आहेत, तिथे गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील नवेगावबांध येथील एक सामान्य व्यक्ती माणुसकीचा असामान्य आदर्श घालून देत आहे. विक्रमसिंह पवार असे या व्यक्तिमत्वाचे नाव असून, ते गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील निराधार, वृद्ध आणि ज्यांना कोणीही वाली नाही अशा लोकांसाठी 'आधारवड' ठरले आहेत.

**सामान्य उदरनिर्वाह, पण असामान्य विचार:**

विक्रमसिंह पवार हे स्वतः अत्यंत कष्टकरी असून आपला परिवार सांभाळण्यासाठी ते 'गुपचूप' विक्रीचा व्यवसाय करतात. दिवसा कष्ट करून कुटुंबाचा गाडा ओढायचा आणि उरलेल्या वेळात समाजातील वंचितांची सेवा करायची, असा




त्यांचा नित्यक्रम आहे. त्यांच्या या निस्वार्थी कार्यामुळे त्यांची कीर्ती आज संपूर्ण जिल्ह्यात पसरली आहे.

वृद्धांची सेवा आणि आरोग्याची काळजी:

अनेकदा घरातून हाकलून दिलेले किंवा ज्यांना सांभाळणारे कोणी नाही, असे वृद्ध लोक पवार यांना रस्त्यावर किंवा वस्तीत आढळतात. अशा लोकांच्या राहण्याची आणि खाण्यापिण्याची सोय करणे, त्यांना वेळेवर औषधोपचार मिळवून देणे यासाठी ते सदैव तत्पर असतात. स्वतःच्या कमाईतील वाटा आणि समाजातील दानशूर व्यक्तींकडून 'वर्गणी' जमा करून ते या कार्याचा डोंगर उभा करत आहेत.

अखेरचा निरोप आणि अंत्यविधीचा सन्मान:

विक्रमसिंह पवार यांच्या कार्याचे सर्वात हृदयस्पर्शी पैलू म्हणजे निराधारांचे अंत्यविधी. ज्या व्यक्तींचे या जगात कोणीही नातेवाईक उरले नाहीत, अशा व्यक्तींच्या मृत्यूनंतर पवार स्वतः पुढे येऊन मुलाप्रमाणे सर्व धार्मिक विधी पार पाडतात. "कोणीही अनाथ म्हणून या जगातून जाऊ नये आणि प्रत्येकाला सन्मानाने निरोप मिळावा," ही त्यांची भावना समाजाला थक्क करणारी आहे.

लोकसहभागातून समाजसेवा:

स्वतःची आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही, ते कोणाकडे हात पसरण्यापेक्षा कार्यासाठी 'लोकवर्गणी' जमा करण्यावर भर देतात. पारदर्शक कारभार आणि प्रामाणिक सेवा यामुळे नवेगावबांध परिसरातील नागरिकही त्यांना मनापासून साथ देतात.

# दुधाचा मोबदला थेट माय-माऊलींच्या खात्यात द्या!" :— आमदार सुरेश धस

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** राज्यातील दूध उत्पादन क्षेत्रात महिलांचे श्रम मोठ्या प्रमाणावर असतानाही त्यांना प्रत्यक्ष आर्थिक लाभ मिळत नसल्याची वस्तुस्थिती अधोरेखित करत "दूध उत्पादनातून मिळणारा मोबदला थेट माय-माऊलींच्या हातात द्या" अशी ठोस आणि अभ्यासपूर्ण मागणी आष्टी-पाटोदा-शिरूर मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांनी महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली. त्यांच्या या वेगळ्या विषयामुळे सभागृहाचे विशेष लक्ष वेधले गेले.



अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना धस यांनी सांगितले की, दूध उत्पादनाच्या क्षेत्रात महाराष्ट्र देशात अग्रेसर असला तरी प्रत्यक्षात या व्यवसायातील कष्टाचा मोठा वाटा महिलांचा असतो. गाई-म्हशींना चारा घालणे, गोठ्याची स्वच्छता करणे, शेण काढणे, जनावरांची देखभाल आणि दुध काढणे अशी सर्व मेहनतीची कामे ग्रामीण भागातील महिला दिवसभर करत असतात. मात्र एवढे श्रम करून ही दूध विक्रीतून मिळणारा मोबदला अनेकदा महिलांच्या हातात येत नाही. घरातील आर्थिक व्यवहार पुरुषांकडेच केंद्रीत असल्याने महिलांच्या श्रमांचे योग्य मूल्य त्यांना मिळत नसल्याची वस्तुस्थिती आहे. त्या मुळे दूध संकलन संस्थांकडून दिला जाणारा मोबदला थेट महिला दूध उत्पादकांच्या नावावर जमा करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. आमदार धस यांनी पुढे नमूद केले की, अनेक ठिकाणी महिलांच्या नावाने दूध उत्पादक सहकारी संस्था स्थापन केल्या जात आहेत. मात्र प्रत्यक्ष आर्थिक लाभ महिलांपर्यंत पोहोचत नसेल तर त्या उपक्रमाचा उद्देश अपूर्ण राहतो. त्या मुळे महिलांच्या नावावर असलेल्या संस्थांमधील दूध मोबदला थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. "माय-माऊलींच्या हातात पैसा गेला, तर त्या त्याचा योग्य हिशोब ठेवून कुटुंबाच्या हितासाठी वापर करतात. त्या मुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होण्यासही मदत होईल," असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या मांडणी दरम्यान सभागृहात उपस्थित सदस्यांनीही या वास्तवाकडे लक्ष वेधले गेल्याची दखल घेतली. ग्रामीण महिलांच्या श्रमांना योग्य आर्थिक अधिकार देण्याच्या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा असल्याचे मत अनेक सदस्यांनी व्यक्त केले.

ग्रामीण भागातील महिला सशक्तीकरण, कुटुंबाच्या आर्थिक व्यवस्थापनात त्यांचा सहभाग आणि दूध व्यवसायातील पारदर्शकता वाढवण्यासाठी शासनाने या मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केली.

# रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर परतूर येथील ईदगाह मैदान स्वच्छतेची मागणी

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना (अशोक ठोके) :** पवित्र रमजान महिन्याचा शेवट जवळ आला असून मुस्लिम बांधवांचा मोठा सण असलेल्या ईद-उल-फित्रच्या नमाजासाठी परतूर येथील ईदगाह मैदानावर मोठ्या प्रमाणात नागरिक एकत्र येतात. या पार्श्वभूमीवर ईदगाह मैदानाची तात्काळ स्वच्छता करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी पत्रकार सय्यद वाजेद यांनी नगरपालिकेकडे केली आहे.ईदच्या दिवशी हजारो मुस्लिम बांधव ईदगाह मैदानावर नमाज अदा करण्यासाठी येत असतात. त्यामुळे मैदान परिसर स्वच्छ,



सुस्थितीत व सुरक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या मैदान परिसरात गवत, कचरा व अस्वच्छता दिसून येत असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो.यामुळे नगरपालिकेने त्वरित लक्ष देऊन मैदानाची साफसफाई करावी, कचरा हटवावा तसेच पिण्याच्या पाण्याची आणि इतर आवश्यक सोयीसुविधांची व्यवस्था करावी, अशी मागणी पत्रकार सय्यद वाजेद यांनी केली आहे.ईद सण शांततेत आणि आनंदात साजरा व्हावा यासाठी प्रशासनाने वेळेत योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# टेनिसपटू तेजस्वी नंदकुमार काटे हिचे संघर्षातून घडलेले यश

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील बेलवाडी गावातील तेजस्वी काटे ही आज राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण करणारी टेनिसपटू ठरली आहे. बारामती तालुक्यातील काटेवाडी हे तिचे मूळ गाव असून सध्या तिचे कुटुंब पिंपरी-चिंचवड येथे स्थायिक आहे.

अवघ्या ९ व्या वर्षी टेनिस खेळण्यास सुरुवात करून तिने अंडर-१० स्पर्धा जिंकत आपली गुणवत्ता सिद्ध केली. दररोज पुण्यातील ॲकाडमीपर्यंत ४०-५० किलोमीटरचा प्रवास करून ती सराव करत असे.आर्थिक अडचणी असूनही कुटुंबाने तिच्या स्वप्नांना पूर्ण पाठिंबा दिला.शालेय स्पर्धेत महाराष्ट्र संघाकडून तिसरे स्थान, राष्ट्रीय स्पर्धेत कांस्यपदक, तसेच इंडोनेशियातील आशियाई ज्युनियर गेम्समध्ये भारताचे प्रतिनिधित्व करून कांस्यपदक मिळवणे ही तिची उल्लेखनीय कामगिरी ठरली.पुढे दोन राष्ट्रीय महिला स्पर्धा जिंकून तिने सातत्यपूर्ण यशाची नोंद केली.

शिक्षणातही तिने प्रावीण्य मिळवले.एमबीए पूर्ण करून Core-co Technologies मध्ये बिझनेस ॲनालिस्ट व सेल्स अँड मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह म्हणून संधी मिळाली. कंपनीने तिला नोकरीसोबत टेनिस कारकीर्द सुरू ठेवण्याची मुभा दिली आणि ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवडले. सध्या ती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी प्रशिक्षण घेत असून खुले गटात भारताचे प्रतिनिधित्व करण्याचे ध्येय ठेवते.तेजस्वी नंदकुमार काटे हिचा प्रवास हा जिद्द,शिस्त,कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मध्यमवर्गीय पार्श्वभूमीतून मोठी स्वप्ने साकार करता येतात याचे प्रेरणादायी उदाहरण आहे.



# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचा अवमान होऊ नये; तात्काळ कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे /लाखनी** : लाखनी शहरातील संत रविदास चौक येथे उभारण्यात आलेला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा अनेक वर्षांपासून समाजासाठी प्रेरणास्थान ठरला आहे. मात्र सध्याच्या परिस्थितीत पुतळ्याच्या परिसरात निर्माण झालेल्या बदलांमुळे पुतळ्याचा अवमान होण्याची शक्यता निर्माण झाल्याचा आरोप करत माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिसमित्र समितीने नगरपंचायत प्रशासनाकडे निवेदन दिले आहे.

या संदर्भात समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी, नगरपंचायत लाखनी यांना निवेदन सादर करून पुतळ्याच्या सन्मानाचे रक्षण करण्याची मागणी केली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे बहुजन समाजाच्या अस्मिता व संघर्षाचे प्रतीक असून त्यांच्या पुतळ्याचा अवमान होणार नाही यासाठी योग्य नियोजन करून पुतळा योग्य त्या ठिकाणी सन्मानाने पुन्हा प्रतिष्ठापित (प्राणप्रतिष्ठा) करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



याशिवाय, पुतळ्याबाबत कोणताही निर्णय घेताना सामाजिक संघटना, नागरिक प्रतिनिधी व अण्णाभाऊ साठे प्रेमींना विश्वासात घेऊन पारदर्शक प्रक्रिया राबविण्याची विनंती निवेदनात करण्यात आली आहे.

जर पुतळ्याचा अवमान होईल अशी कोणतीही घटना घडली किंवा योग्य निर्णय न घेतल्यास संबंधित घटक व नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनावर रोशन खोब्रागडे, भावेश धंधुकीया , संतोष ऊकनकर, स्वप्नील काटवले , शुभम खवसकर व पंकेश पडोळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# “महिला शक्तीचा गौरव! वर्षा भगत यांना आमदार सईताई डहाके यांच्या हस्ते ‘महिला सन्मान पुरस्कार"

## महिला दिनानिमित्त कृषी उत्पन्न बाजार समितीचा भव्य कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशीम जागतिक महिला दिनानिमित्त ८ मार्च २०२६ रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य कार्यक्रमात समाजकार्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वर्षा भगत यांचा “महिला सन्मान पुरस्कार” देऊन गौरव करण्यात आला. हा पुरस्कार आमदार सौ. सईदाताई प्रकाश दादा डहाके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

महिला सक्षमीकरण, बचत गटांची उभारणी आणि समाजहितासाठी सातत्याने केलेल्या कार्याची दखल घेत वर्षा भगत यांना या पुरस्कारासाठी निवडण्यात आले. कार्यक्रमामध्ये




महिला सन्मान सोहळा व विविध वस्तूंचे वितरणही करण्यात आले. या सोहळ्याला मोठ्या संख्येने महिला, सामाजिक कार्यकर्त्या तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महिला सक्षमीकरणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, बचत गटांच्या माध्यमातून उद्योग व्यवसाय उभे करावेत आणि समाजाच्या प्रगतीत सक्रिय सहभाग घ्यावा, असा संदेश मान्यवरांनी दिला.

यावेळी वर्षा भगत यांच्या सामाजिक कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. त्यांनी महिलांच्या बचत गटांना प्रोत्साहन देऊन अनेक महिलांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग दाखवला आहे. समाजातील महिलांना संघटित करून विविध उपक्रम राबविण्यात त्यांचा मोठा सहभाग राहिला आहे. त्यामुळेच त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना या प्रतिष्ठित सन्मानाने गौरविण्यात आले.

सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन वर्षा भगत यांचा सत्कार करण्यात आला. सन्मान स्वीकारताना त्यांनी हा पुरस्कार सर्व महिला बचत गटातील सदस्यांचा असल्याचे सांगत भविष्यातही समाजासाठी कार्य करत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी वर्षा भगत यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. महिला सन्मान सोहळ्यामुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.महिला बचत गट सक्षमीकरण, सामाजिक उपक्रम आणि महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी केलेल्या कार्यामुळे वर्षा भगत यांचे नाव परिसरात आदराने घेतले जाते. त्यांच्या या कार्याची दखल घेत महिला दिनाच्या निमित्ताने त्यांना “महिला सन्मान पुरस्कार” देऊन गौरविण्यात आले.

# एका धाडसी धोरणाला अखेर फासला हरताळ; भारताच्या २०२५च्या भूकंपीय संहितेची माघार

केंद्र सरकार आता नवीन भूकंपीय संहिता मागे घेण्याच्या तयारीत आहे, जी वैज्ञानिक समुदायानं भूकंप आणि त्यांच्या भारतावरील संभाव्य परिणामांबद्दल जे काही जमा केलं आहे त्यावर आधारित होती. भारतीय पद्धती समकालीन जागतिक मानकांशी जुळवून घेण्याचा हा एक खरा प्रयत्न आहे.

भूकंप क्षेत्रीकरण नकाशा भारतातील वेगवेगळ्या प्रदेशांचे त्यांच्या भूकंपीय धोक्याच्या क्षमतेवर आधारित वर्गीकरण करतो. तो एक महत्त्वाचा उद्देश पूर्ण करतो, ते म्हणजे भूकंपांना तोंड देण्यासाठी संरचना किती मजबूत असाव्यात हे ठरवणे, त्याद्वारे इमारत संहिता आणि पायाभूत सुविधा नियोजनाचे मार्गदर्शन करणे यांचा समावेश होतो.

**२०२५ची पुनरावृत्ती: एक मूलगामी सुधारणा** - भारताने नोव्हेंबर २०२५ मध्ये भारतीय मानक ब्युरो (BIS) ने विकसित केलेल्या नवीन भूकंप डिझाइन कोड (IS १८९३:२०२५) अंतर्गत एक नवीन सुधारित भूकंपीय क्षेत्रीकरण नकाशा जारी केला. ही सुधारणा व्यापक वैज्ञानिक डेटावर आधारित होती, ज्यामध्ये फॉल्ट सिस्टम, जास्तीत जास्त-संभाव्यता घटना, क्षीणन वैशिष्ट्ये, टेक्टोनिक सेटिंग्ज आणि लिथोलॉजी यांचा समावेश होता.

मागील वर्गीकरणात, भारतीय भूभाग चार भूकंपीय झोनमध्ये विभागला गेला होता : झोन II, III, IV आणि V, ज्यामध्ये झोन V सर्वाधिक धोका दर्शवितो. नवीन वर्गीकरणातील अद्ययावत नकाशामध्ये भूकंपाच्या धोक्याच्या वितरणाची अधिक सूक्ष्म समज प्रतिबिंबित करणारा एक नवीन सर्वाधिक जोखीम असलेला झोन VI सादर केला आहे. सर्वात नाट्यमय बदल म्हणजे झोन VI या नवीन सर्वाधिक जोखीम असलेल्या श्रेणीची निर्मिती, ज्यामध्ये संपूर्ण हिमालयीन पट्टा आणि अंदमान आणि निकोबार बेटे भारताच्या सर्वोच्च भूकंपाच्या धोक्याच्या वर्गीकरणात समाविष्ट केली गेली आहेत, ज्यामुळे या प्रदेशाची अत्यंत आणि पूर्वी कमी लेखलेली भूकंपीय क्षमता मान्य केली गेली आहे.

हे पुनर्वर्गीकरण एक मोठी वैज्ञानिक प्रगती दर्शवते, जे भारताच्या धोक्याच्या मूल्यांकनाला समकालीन जागतिक मानकांशी जुळवून घेते. बांधकाम खर्च, पायाभूत सुविधा नियोजन आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, देशातील सर्वात भूकंपीयदृष्ट्या संवेदनशील प्रदेशांमधील सार्वजनिक सुरक्षेवरही याचा खोल परिणाम होतो.

**वैज्ञानिक प्रगतीचा उलटफेर** - मंगळवारच्या केंद्रीय मंत्रिमंडळ सचिवालयाच्या सल्ल्यानुसार, ग्राहक व्यवहार विभागाच्या अंतर्गत भारतीय मानक ब्युरो (BIS) ने देशाच्या भूकंप-प्रतिरोधक डिझाइन मानकांमध्ये सुधारणा करणारी नोव्हेंबर २०२५ची राजपत्र अधिसूचना मागे घेतली. माघार विशेषतः IS १८९३ (भाग १): २०२५च्या सातव्या पुनरावृत्तीला लक्ष्य करते, ज्यामध्ये भारतासाठी सुधारित भूकंपीय झोनेशन नकाशा समाविष्ट होता.

फेब्रुवारी २०२६ मध्ये गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने (MoHUA) नवीन संहितेच्या "तांत्रिक आणि आर्थिक चिंतांबद्दल" दिलेल्या इशाऱ्यानंतर हा हस्तक्षेप केला. मंत्रिमंडळाच्या कार्यालयीन निवेदनात म्हटलं आहे की ही सुधारणा "मेट्रो रेल्वे प्रकल्पांसह चालू आणि भविष्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या डिझाइन आणि अंमलबजावणीवर भौतिकदृष्ट्या परिणाम करते".



अद्ययावत केलेल्या संहितेमुळे आधुनिक, कामगिरीवर आधारित भूकंपीय डिझाइनकडे एक महत्त्वपूर्ण झेप दिसून आली. त्यात भूकंपीय झोनिंग, डिझाइन स्पेक्ट्रा, कडकपणा आवश्यकता, दुहेरी प्रणाली तरतुदी आणि भू-तांत्रिक मूल्यांकनांमध्ये मूलभूत बदल करण्यात आले.

ही सुधारणा प्रगत संभाव्य भूकंपीय धोका मूल्यांकन (PSHA) पद्धतींद्वारे चालविली गेली, ज्यामध्ये भूकंपीय प्रक्रियांचे अधिक वास्तववादी अंदाज तयार करण्यासाठी ऐतिहासिक भूकंपीयता, सक्रिय दोष आणि इतर निकष एकत्रित केले गेले. वैज्ञानिक समुदायाच्या लक्षात आलं की भारताच्या भूभागाच्या ६१%, जिथे सुमारे ७५% लोकसंख्या राहते, मध्यम ते तीव्र भूकंपांना बळी पडते. नवीन नकाशाने शेवटी डेटा आणि अनुभव यांचा मेळ घातला.

**जिंकलेला आर्थिक युक्तिवाद** - बांधकाम लॉबीने नवीन भूकंपीय झोनिंग नकाशा मागे घेण्याच्या निर्णयाचं स्वागत केलं. विकासकांनी असा युक्तिवाद केला की प्रगत नियोजनातील प्रकल्पांसाठी मानके मध्येच बदलणे "तांत्रिकदृष्ट्या अशक्य" आहे आणि त्यामुळे बांधकाम खर्च २०% वाढेल. एकट्या अहमदाबादमध्ये, नवीन आवश्यकतांमुळे अंदाजे १५ मोठे उंच इमारतींचे प्रकल्प रखडले होते.

खर्चाचे परिणाम लक्षणीय होते. सुधारित कोडमुळे बेस शीअर डिमांड १०-३० टक्क्यांनी वाढतात, अनियमिततेच्या तरतुदी कडक होतात आणि अधिक जटिल विश्लेषणे अनिवार्य होतात. मेट्रो आणि इतर सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी, मेट्रो शहरांमध्ये खर्च ३०% ते ५०% वाढू शकतो. मंत्रिमंडळाने नमूद केलं की कोड "मेट्रो रेल कॉर्पोरेशनशी संरचित सल्लामसलत न करता सादर करण्यात आला".

**माघार घेण्यापूर्वीची असमान अंमलबजावणी** - माघार घेण्यापूर्वी, अंमलबजावणीने आधीच गोंधळ निर्माण केला होता. गुजरातमधील महानगरपालिकांनी अत्यंत भिन्न दृष्टिकोन स्वीकारला. अहमदाबाद महानगरपालिकेनं प्रकल्पांना तत्काळ कोड अंमलबजावणीचा आग्रह धरला आणि प्रकल्प रखडले. दरम्यान, सुरत, वडोदरा आणि राजकोटने सहा महिन्यांच्या संक्रमणकालीन कालावधीचा हवाला देत २०१६च्या कोड अंतर्गत प्रकल्पांना मंजुरी देणं सुरू ठेवलं. अहमदाबादमधील विकासकांनी निषेध केला की शहराचा आग्रह "केंद्राच्या संक्रमण तरतुदीशी विसंगत" आहे.

धोरणाला हरताळ फासून उलट मार्गानं प्रवास म्हणजे २०१६च्या मानकांकडे परत जाणे, भारताच्या पायाभूत सुविधांना खरोखर सुरक्षित बनवणाऱ्या अर्थपूर्ण सुधारणा सोडून देणे हे स्पष्ट होतं. नवीन कोडमध्ये काय समाविष्ट होतं :

- संभाव्य धोक्याच्या मूल्यांकनावर आधारित पूर्णपणे सुधारित भूकंप झोनिंग नकाशा
- १० सेकंदांपर्यंत जमिनीची गती परिभाषित करणारा अद्ययावत डिझाइन स्पेक्ट्रा
- माती-संरचनेच्या परस्परसंवादाच्या व्यापक तरतुदी
- सुधारित द्रवप्रभाव मूल्यांकन प्रक्रिया
- भूकंपीय क्षेत्रांवर आधारित संरचनात्मक प्रणालींसाठी स्पष्ट नियम

हिमालयीन आणि अंदमान-निकोबार आर्कच्या भूगर्भीयदृष्ट्या नाजूक भागात, जिथे सरकार-पुरस्कृत प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्प राबवले जात आहेत, या भागात मागे जाण्याचा अर्थ असा आहे की या प्रदेशाला तोंड द्यावं लागणाऱ्या भूकंपीय वास्तवासाठी अपुऱ्या असलेल्या मानकांनुसार बांधकाम सुरू ठेवणे. अर्थात आधीच जोखलेल्या धोक्याला थेट आमंत्रण देणं.

भारतातील सर्वात महत्त्वाकांक्षी आणि वादग्रस्त पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एकाचे परिणाम विचारात घ्या : ग्रेट निकोबार बेटावरील गॅलाथिया खाडी येथे नियोजित भव्य ट्रान्सशिपमेंट पोर्ट. आता मागे घेतलेल्या २०२५च्या भूकंपीय संहितेनुसार, संपूर्ण प्रकल्प स्थळ नव्याने तयार केलेल्या झोन VI मध्ये ठेवले आहे - हा प्रदेशाचा अत्यंत भूकंपीय धोका मान्य करून, हा सर्वात जास्त धोका असलेल्या श्रेणीत आहे.

कोड गेल्यानंतर, बांधकाम व्यावसायिकांना झोन VI ने मागितलेल्या मानकांचे पालन करण्याची आवश्यकता नाही. ते मागे घेतलेल्या अधिसूचनेचा हवाला देऊन भूकंपीय जोखीम कमी करू शकतात आणि २०१६च्या कमी कठोर मानकांनुसार बांधकाम सुरू ठेवू शकतात - अशा प्रदेशात जिथे शास्त्रज्ञ स्पष्टपणे इशारा देतात की अशा पायाभूत सुविधांसाठी जुनी मानके अयोग्य आहेत.

बांधकाम उद्योगाच्या प्रवक्त्यांपैकी एकाने या माघारीचं स्वागत करताना म्हटलं की नवीन संहिता "संबंधितांशी सल्लामसलत न करता" तयार करण्यात आल्या आहेत. परंतु या बचावामुळे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो : जेव्हा जीवन-सुरक्षा मानकांचा विचार केला जातो - जिथे दावे रुपयांमध्ये नव्हे तर मानवी जीवनांमध्ये मोजले जातात - तेव्हा भागधारकांचा सल्ला, म्हणजेच खर्चाबद्दल काळजी करणारे बांधकाम व्यावसायिक, भूकंपाच्या धोक्याबद्दल वैज्ञानिक सहमतीपेक्षा पुढे जावे का?

सरकारने पुढील कोणतेही पाऊल उचलण्यापूर्वी संबंधितांशी सल्लामसलत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. तरीही ज्या वैज्ञानिक समुदायाच्या दशकांच्या संशोधनानं आता सोडून दिलेल्या संहितेची माहिती दिली आहे त्यांच्याशी सल्लामसलत करण्याचे कोणतेही समांतर आवाहन नाही. भूकंपशास्त्रज्ञ, भूकंप अभियंते आणि धोका मूल्यांकन तज्ञ - ज्यांचे ज्ञान या प्रगतीशील सुरक्षा मानकाला आधार देते - तेच लोक ते मागे घेण्यास कारणीभूत ठरलेल्या चर्चेतून स्पष्टपणे अनुपस्थित आहेत.

भारताने आता २०१६च्या मानकांनुसार बांधकाम सुरू ठेवले पाहिजे, अशा जगात जिथे भूकंपाच्या धोक्याची वैज्ञानिक समज बरीच प्रगत झाली आहे. धाडसी धोरण मागे घेण्यात आले. वैज्ञानिकांना प्रश्न पडला आहे की, जोखीम चांगल्या प्रकारे जाणणाऱ्या शास्त्रज्ञांशी चर्चा न करता हे धोरण मागे का घेतले गेले हे आम्हाला अजूनही माहीत नाही. ज्या देशात ७५% लोकसंख्या भूकंपप्रवण क्षेत्रात राहते, तिथे कोणाचा आवाज जास्त महत्त्वाचा असायला हवा - बांधकाम व्यावसायिकांचा की जीवन मूल्य जाणणाऱ्या शास्त्रज्ञांचा? खरं तर या प्रकारे जी प्रगती होऊ घातली आहे त्यातून दुसरं काही होणार नाही तर जास्तीत जास्त जीव जाण्याची टांगती तलवार मात्र कायम डोक्यावर असेल.

**- सी.पी. राजेंद्र**

# करिअर कधी निवडावं ? मुलांच्या भविष्यासाठी तज्ञ सांगतात

दहावीची परीक्षा झाली की अनेक घरांमध्ये एकच प्रश्न चर्चेत असतो पुढे कोणती शाखा निवडायची? सायन्स, कॉमर्स की आर्ट्स? अनेक पालक आणि विद्यार्थी याच टप्प्यावर करिअरचा विचार सुरू करतात. मात्र तज्ज्ञांच्या मते करिअरची दिशा ठरवण्याची ही वेळ खूप उशिराची असते.

हल्लीच्या स्पर्धेच्या काळात योग्य करिअर निवडण्यासाठी आधीपासून तयारी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची आवड, क्षमता आणि भविष्यातील संधी लक्षात घेऊन योग्य मार्गदर्शन मिळाल्यास मुलांना आपला मार्ग स्पष्टपणे दिसू शकतो. म्हणूनच करिअरचा विचार केवळ दहावीनंतर नाही तर त्यापूर्वीच सुरू करणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

**करिअरची दिशा कधी ठरवावी?**

दहावीची परीक्षा झाली की अनेक घरांमध्ये एकच प्रश्न चर्चेत असतो पुढे कोणती शाखा निवडायची? सायन्स, कॉमर्स की आर्ट्स? अनेक पालक आणि विद्यार्थी याच टप्प्यावर करिअरचा विचार सुरू करतात. मात्र तज्ज्ञांच्या मते करिअरची दिशा ठरवण्याची ही वेळ खूप उशिराची असते.

हल्लीच्या स्पर्धेच्या काळात योग्य करिअर निवडण्यासाठी आधीपासून तयारी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची आवड, क्षमता आणि भविष्यातील संधी लक्षात घेऊन योग्य मार्गदर्शन मिळाल्यास मुलांना आपला मार्ग स्पष्टपणे दिसू शकतो. म्हणूनच करिअरचा विचार केवळ दहावीनंतर नाही तर त्यापूर्वीच सुरू करणे गरजेचे असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

**करिअरचा विचार दहावीनंतरच का केला जातो?**

अनेकदा पालक आणि विद्यार्थी दहावीच्या निकालानंतरच करिअरचा निर्णय घेण्याचा प्रयत्न करतात. निकालानंतर अचानक कोणती शाखा निवडायची याचा विचार सुरू होतो. त्यामुळे अनेकदा मुलं गोंधळात पडतात आणि घाईत घेतलेले निर्णय पुढे बदलावे लागतात. तज्ज्ञांच्या मते ही प्रक्रिया खूप आधी सुरू व्हायला हवी. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी आणि क्षमतांबद्दल समज मिळावी यासाठी आठवी किंवा नववीपासून मार्गदर्शन मिळणे अधिक उपयुक्त ठरते.

**लवकर करिअर नियोजन का महत्त्वाचे?**

विद्यार्थ्यांनी सहावी ते आठवी या वयोगटात विविध क्षेत्रांची माहिती घेण्यास सुरुवात करावी. या वयात मुलांना वेगवेगळ्या क्षेत्रांबद्दल माहिती दिल्यास त्यांची आवड आणि क्षमता ओळखणे सोपे होते. उदाहरणार्थ, एखाद्या कॉलेज किंवा शैक्षणिक संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना सुरुवातीपासूनच विविध क्षेत्रांबद्दल मार्गदर्शन दिले जाते. काही ठिकाणी विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार वेगवेगळ्या गटांमध्ये त्यांना अभ्यासासाठी तयार केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपला उद्देश कळतो आणि ते त्यानुसार अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकतात.

**स्पष्ट ध्येय असल्यास अभ्यासावर अधिक लक्ष**

करिअरची दिशा लवकर ठरली तर विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजते. उदाहरणार्थ, एखाद्या विद्यार्थ्याला इंजिनिअरिंग किंवा वैद्यकीय क्षेत्रात जायचे असल्यास त्यासाठी लागणारी मेहनत आणि गुण याची त्याला आधीपासून जाणीव असते. त्यामुळे तो त्या दिशेने सातत्याने प्रयत्न करू शकतो. अनेक प्रतिष्ठित महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी जास्त गुणांची गरज असते. त्यामुळे योग्य करिअर निवडण्यासाठी विद्यार्थ्यांनी आधीपासूनच तयारी करणे आवश्यक ठरते.

**पालकांची भूमिका महत्त्वाची**

विद्यार्थ्यांच्या करिअर निवडीत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मुलांवर एखादे क्षेत्र लादण्यापेक्षा त्यांच्या आवडी समजून घेणे अधिक आवश्यक आहे. योग्य मार्गदर्शन, माहिती आणि प्रोत्साहन दिल्यास मुलांना स्वतःची क्षमता ओळखणे सोपे जाते.

म्हणूनच, स्पर्धात्मक काळात करिअर नियोजन लवकर सुरू करणे गरजेचे आहे. योग्य वेळी मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थ्यांना आपल्या भविष्यासाठी योग्य दिशा निवडणे सोपे होते आणि त्यांचा आत्मविश्वासही वाढतो.